म.ग्रं.सं. ठाणे
विषय : काव्य
सं. क्र. : २३००
REFBK 0022591
REFBK-0022591

# कवितेनंतरच्या कविता

दिलीप पुरुषोत्तम चित्रे

REFBK-0022591

वाचा प्रकाशन १४

कवितेनंतरच्या कविता : दिलीप पुरुषोत्तम चित्रे

ऑक्टोबर १९७८

सर्व हक्क रा. दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांचे स्वाधीन

मुखपृष्ठ : 'द आय' मुंबई; छायाचित्रकार : आशय चित्रे.

प्रती : १००० आवृत्ती पहिली किंमत पंधरा रुपये

प्रकाशक : भालचंद्र नेमाडे, वाचा प्रकाशन, औरंगाबाद ४३१ ००४

मुद्रक : वि. ग. माटे, ४०५ नारायण पेठ, पुणे ४११ ०३०

प्रस्तुत संग्रहात १९५८ ते १९७७ ह्या कालखंडातल्या रा. दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्या कविता प्रसिद्ध होत आहेत. 'कविता' हा रा. चित्रे यांचा पहिला कवितासंग्रह १९६० साली मौज प्रकाशनाने काढला होता. त्या संग्रहाची पहिली आवृत्ती आता अठरा वर्षांनी संपली आहे. प्रस्तुत संग्रहानंतर रा. चित्रे यांचा आणखी एक कवितासंग्रह लवकरच प्रसिद्ध होईल.

रा. चित्रे यांचे नाव मर्ढेकरोत्तर कवींमधे प्रामुख्याने घेतले जाते. त्यांच्यावर महत्त्वाची समीक्षा लिहून झाली नाही, तरी त्यांनी स्वतः अत्यंत महत्त्वाची समीक्षा लिहिली आहे. असे कवी–टीकाकार मराठीत नाहीतच. मराठी वाङ्मयीन संस्कृतीचे भान असणाऱ्या थोड्या सुबुद्ध लेखकांपैकी ते एक आहेत. त्यांनी समीक्षेशिवाय कथा, भाषांतरे, प्रवासवर्णन, इंग्रजी व मराठी बरेच लेखन केले असले तरी वयाच्या १५–१६ व्या वर्षापासून कविता हेच त्यांचे आत्मप्रकटीकरणाचे प्रमुख साधन आहे.

नव्या मराठी कवितेची समृद्धी कळून येण्यासाठी रा. चित्रे यांची कविता समजून घेणे अपरिहार्य आहे. त्यांनी मराठी कविता खऱ्या अर्थाने भावोत्कट केली. नवी शब्दकळा कवितेत रूढ केली. शब्दकळेचा अतिव्यय हे त्यांचे जगण्याचा उत्सव साजरा करण्याचे एक महत्त्वाचे माध्यम आहे. मर्ढेकरोत्तर नवकवींनी रूढ केलेले भावनाप्रधान व विचारप्रधान असे कवितेचे विभाजन अप्रस्तुत ठरावे अशी नवी शैली त्यांनी निर्माण केली. तंत्रांचे नानाविध प्रयोग केले. स्वचे अव्यक्तीकरण करून संवेदनांचे सरळ भाषांकन करणे, भाषेला सतत कवितेच्या सार्वभौमत्वाचे भान देणे, शब्दांच्या विविध गुणांचा जल्लोष उमटवत रहाणे हे त्यांच्या कवितेचे विशेष मराठी कवितेला वळण देणारे ठरले. त्यांच्या कवितेची पाळेमुळे जुन्या मराठी कवितेपासून आधुनिक युरोपियन कवितेपर्यंत किती विस्तीर्ण क्षेत्रांत पसरली आहेत हे त्यांच्या वसुधैवकुटुंबी प्रतिमांमधून व्यक्त होते. रा. चित्रे यांच्या कविता मराठी कवितेच्या आधुनिकीकरणाचे उदाहरणच होत.

औरंगाबाद
२० ऑक्टोबर १९७८

भालचंद्र नेमाडे
प्रकाशक

२२५८९
काव्य
२३८८

१.

त्या सुन्न स्त्रीच्या अंगामधून आरपार जन्मांध
माझ्या सूर्यपूजक मंत्रांचे जातात निनाद
आणि अश्मयुगीन अहंकाराचे टोलेजंग अज्ञान
कोसळते मृतांच्या मृत्तिकेच्या घटिकेत
शरीर आणि अशरीर यांच्या ध्रुवाभोवती
आमच्या प्रत्येक समागमाचा फिरतो आस.

माझ्या उत्तुंग काटेरी हाताच्या आवाक्यात
तिला येतात पूर्वनियोजित अपूर्व फुले
मात्र तिच्यातल्या निर्विकार इंद्रियावकाशात
माझ्या अर्थपूर्ण रक्ताच्या घटका भरत असतात.

थडथडत्या नाडीतल्या ओसरत्या लयीत
माझा राठ हात ढाळतो तिच्या त्वचेवर अश्रू.

एका अनपेक्षित फासाला झोका समजून.
□

२.

बागडतात ओसाडलेली अंगं चांदण्या वासात
गोंदून घेत स्वस्तिके आपल्या गूढ होणाऱ्या त्वचेवर
आणि झुळुकाझुळुकांनी भराभर अनावृत होतात
त्यांच्या कोमल, मैथुनोत्तर हुंदक्यांचे हात
ज्यांनी कवळून धरलेला चंद्र जातो आंबून
निंबोणींची झाडं होतात स्तब्ध पुन्हा सळसळून.
□

## २. चरित्र

तो चालत गेला चरित्राच्या चित्रमय चतकोरात
त्याच्या कर्णपटलांवर कोरलेले सहस्र रातकिडे
चमकले चांदण्या होऊन. त्याच्या श्वासांचे उत्तुंग स्तंभ
खिळलेले. त्याच्या बाहूंच्या सारंग्यांवर
फिरले न ऐकलेल्या वाऱ्यांचे गज,
त्याचे शरीर गुणगुणले चरित्राच्या चित्रमय चतकोरात
लोळण घेत भाषेच्या रंगमय होळीत.

तो आला न्हाऊन एका उज्ज्वल समुद्रात
सुकवीत कोवळ्या उन्हात आपला धवल आत्मा
खारट झालेला. आणि शुभ्र वाळूचे ढीग कोसळले
त्याच्या खरखरीत कर्णपटलांवर. त्याने गोंदल्या
फुटणाऱ्या लाटा आपल्या छातीवर, आणि पाठीवर
एक शिंपला, एक प्रगल्भ सूर्य, एक धनुष्य.

तो चालत गेला चरित्राच्या दाट शहरात
त्याच्या भोवताली घोंगावले लोकसंख्येचे आकडे
लाल-हिरवे दिवे होऊन. त्याचे पाय अडकले रुळांत
आणि तो झाला आंधळा एंजिनाच्या दिव्याच्या झोतात
त्याच्या कर्णपटलावरून गेली धडधडत गाडी
आणि त्याच्या श्वासांच्या तारा खाली कोसळल्या
ताठ आणि उत्तुंग पोलादी खांबांवरून
तो चालत गेला चरित्राच्या अपरिहार्य काळोखात.

तिथे स्त्रियांच्या हावभावात त्याने उधळला गुलाल
आणि त्यांच्या अंगांचा शुभ्र कोळसा पाहिला चाचपून
तिथे त्याने झोकले जळत्या पेट्रोलचे ग्लास
आणि ओकले घशात अडकलेले समुद्र
तिथे तो ढसाढसा रडला आपल्या बापाची आठवण काढून
आणि किंचाळला धर्माला पारखा होऊन
गडगडत खाली आला तो दगडी जिन्यावरून
आणि शुद्धीवर आला अंधुक चरित्राच्या चतकोरात

तिथे त्याच्या भावनेचा गुडघा गेला मोडून
आणि त्याच्या आकांक्षेचे पडले पुढले दात
त्याचा नैसर्गिक स्वभाव ठिकठिकाणी मुरगळला
आणि त्याच्या मुक्या आणि बहिऱ्या शरीरात
चरित्राचे कॅलिडोस्कोप फुटून विखुरले.

□

## ४. शहरी कबुतरे, पारवे

१

राखेच्या रंगाचे पंख दिलेत म्हणूनच कदाचित्
माणकासारखे विस्तवी असतील डोळे
किंवा पारव्या, कबऱ्या रंगाच्या संध्याकाळी
अधिक पारवे, कबरे असतात सगळे
जमलेले पंख लोखंडी कुंपणाआड
हिरवळीवर अथवा दगडावर.

२

कुणीही उधळावेत मूठभर दाणे
पदरची चवली खर्चून व निढळाचा घाम
मळक्या हातरूमालाने पुसत, पहावा
प्लेटॉनिक निर्वासितांचा राखी जमाव
शहरात निर्भयपणे दाणे टिपताना
हिरवळीवरून, दगडावरून.

३

मीही परतलोय सर्वांगाला राख फासून
विस्तवी माणकासारख्या डोळ्यांनी या शहरात
पारव्या संध्याकाळच्या प्रकाशओहोटीत
मला दाणे हवेत, मूठभर दाणे,
कुणाच्याही – पण पदरच्या चवलीचे –
ह्या दगडावर, हिरवळीवर.

४

बदल्यांत देतोय मी फक्त माझ्या परतीची
थकलेली हालचाल. कोणी घाम पुसत
स्वतःचा बघावी अशी. राखी शरीराची,
विस्तवी डोळ्यांची. वासलेल्या चोचीची
प्लेटोपलीकडच्या क्षितिजातून परतलेल्या पंखांची.
□

## ५. खिडकी

१

जसे लाटेत गढूळ गणपती
विरघळतात, ऐकत आरती.
तशा ह्या खोलीच्या भिंती
जेव्हा येतात आठवणी :

पोपड्यापोपड्यांनी गळतात रंग
छतांतूनही पाझरतं पाणी
सर्द अंधारात पापणी
जशी पुस्तकाच्या पानातील खूण.

पसर, पसर धुरकट किरणांतून रात्री;
उपनगरांत, बागांत कागदोपत्री
तुझाच काळोख पोचेल अखेर.
संभोगोत्तर औदासीन्यासारखे आकाश
या खोलीच्या एकुलत्या खिडकीतून दिसते
विरघळल्या भिंतींना थंड ग्लानी विस्तारते.

२

कोळ्याच्या जाळ्यासारखे धोकेबाज धागे
चांदण्याचे नसतात. पण कोळ्यासारखाच
क्वचितच दिसतो चंद्र. या इथून
खिडकीतून दिसतात काळ्या सावल्या फक्त

बाहेरच्या झाडांच्या. त्यांतूनच सळसळतो
गॅसच्या दिव्याचा अन् चंद्राचा प्रकाश
एकाकी बूट जातात दूर दूर रस्त्याशी फटकून
तशी क्रमाक्रमाने वाढत जाते मुकाट रात्र
बाहेरची पण त्या वरवरच्या शांततेतही
कुणाच्या शब्दांचे स्वल्पविराम, मोटारींचे डॅश्,

३

विजेचा फ्लॅश् – पावसाळ्यात क्षणभर
स्पष्ट दिसतो त्यांतच आढ्यावरचा बंद
बल्ब. मग येतो गडगडाट थडकत
बंद तावदानावर. जमलेले ओहळ
लाकडी फरेमवर साचतात. बाहेर सतत
पावसाचा कमीजास्त वेडसर घोष.
ऐकता ऐकताच पडतो माझ्या गळ्याला शोष
अर्धवट झोपेतच माझ्या अंगावरून
जातात कोरडे कुत्सित लोंढे घोंघावून.

४

वर्षातून काही महिने प्रखर प्रकाश
भपकाऱ्यासारखा भणभणत येतो खिडकीतून
बाहेरचा कोलाहल अधिकच वाढतो.
घामाने भिजलेला सदरा मी काढतो,
समोरच्या खिडकीतली प्राचीन म्हातारी

निवडण-टिपण करताना. समोरच्या इमारतीत
सर्वच खिडक्या उघडलेल्या. बाहेरचे झाड

नाही येत आड त्या प्रखर प्रकाशाच्या
मी डोळे मिटून – गृहीत धरतो एक सोनेरी
आकाश (विसरायला त्या थेरडीची जुनेरी)
ज्यांत सुरेख तरंगतात सत्तावीस कावळे
अगदी मोजून. मग प्राणपणाने डोळे उघडून
मी बघतो समोरच्या सत्तावीस खिडक्या
सर्वच जशा लाल लुगड्यात बाया बोडक्या
फुलवाती वळताना स्तोत्रे पुटपुटणाऱ्या

५

माझ्या खिडकीचा विशिष्ट दृष्टिकोण
आहे ह्या मजल्यावर अवलंबून
आणि तिचे पूर्वग्रह सगळेच
ह्या समोरच्या झाडावर विसंबून

पण शक्यतो मी खिडकी उघडीच ठेवतो
खिडकीवर होतात संस्कार
धुराचे व किरणांचे, गलबल्याचे,
समोरच्या सत्तावीस नजरांचे.

कोणी म्हणतात हिला पडदा हवा
फिकट हिरवा, गर्द जांभळा, वा पारवा
आणि खोलीत फुलदाणी, टेबलक्लॉथ नवा

हा लत्ता आहे गलथान अन् गचाळ
आणि विशेषतः घाणेरडी आहे ही चाळ.
या गोष्टींचा विचार करायला हवा मी खिडकीतून

□

## ६. आत्महत्येचा आराखडा

अगणित, थंड, कोरड्या, अचूक, करड्या रात्री
विजांनी उजळलेले काही उत्तुंग सापळे
ओल्या डांबरावरला प्रकाश लाल-निळा
लागतात प्राणांना इथे पोलादी कात्री

सुरांच्या. थंड कोरड्या अचूक रात्री
सिमेंटचे खडे उत्तुंग दुतर्फा सापळे
नशिबाचे लिफ्ट उतरते निर्विकार मजले
आणि लोटते एका अचूक रस्त्यावर कोरड्या

कोणा रोमँटिक माडीवरून एकाकी जीव
मुठीत नसलेला. पुन्हा तो मजला
न्याहाळते नशिब कोरड्या रस्त्यांतले
मान उंच करून, नजर पुरती फाडून.

अगणित थंड कोरड्या अचूक करड्या भावना
जन्म घेतात ओल्या डांबरी रस्त्यावर
बेवारशी. फाटका खिसा चाचपतात
बांधतात मनसुब्यांचे उत्तुंग सापळे

मान उंच करून वर पहात, नजर फाडून
कोरड्या अचूक रस्त्यांतून. दिव्यांच्या ओळी
वर वर वाचत जात. मोजत खिडक्या
मनसुब्याच्या बांधकामाच्या. अगणित अचूक.

चढून जातात जिन्यानेच यावेळी इमारत
आणि मनसुब्याच्या अंतिम मजल्यावरून
खालच्या टिंबमय अंधार-प्रकाशात
देतात स्वतःला सणकीत झुगारून

रोमँटिक माडीवरून, अचूक करड्या रस्त्यावर
ओल्या डांबरावरल्या आरक्त-निळ्या प्रकाशात

☐

## ७. प्रवास

आकडा नव्हतो, चिन्ह होऊन जन्मलो.
पाषाणांतली स्वगते, सप्तकांच्या छटा
अंगे बदलली ऋतुमानाप्रमाणे
साक्षर केले देश, सशब्द माणसे.
हृदय स्वतःत वळसे घेत गेलं दूर.
एक रांड, एक ज्वालामुखी, पुष्कळसे भिकारी,
कलिंगड खाणारा एक महारोगी,
यांच्यापुढे सूर्योदय मावळले किती.
ताठ स्नायूसारखा मध्यम लावला.
मारव्यासारखा अगतिक झालो.
काळोखात पिळले ट्रंपेटचे सुवर्ण.
सारंगीसारखा झुळझुळलो.
पियानोवर उधळले रत्नांचे कण.
कर्कश, बेसूर झालेले दिवस काही.
कोळ्यासारखी क्रूर काळी व्यंजने
नाजूक पंखांचे तडफडते स्वर.
तुझ्या जाळ्यात गुरफटलो अधिकच
मांसभक्षक काटेरी; मिठीत घुसला विश्वाचा अर्थ.

प्रवास जसा जाळे अफाट
कवितांचे विषारी तंतू पसरून
किरणांचे झालेले हे सगळे जग
□

## ८. बाजार

टेक्निकलर बाजारात भाज्यांचे नि फळांचे ढीग
काळसर-हिरवे, पोपटी, पिवळे, जांभुळसर लाल,
किंवा पांढरे मासळीचे आकार तडफडून थंड
झालेले. कमीजास्त ओतप्रोत चोळ्या
कोळणींच्या. कमीजास्त भरदार अंबाडे
माळणींचे. कोणा फळवाल्यांच्या मिशा घोसदार
तरंगतात द्राक्षांवर. कोणाचे डोळे
अननसाआड राहतात. बाजार आहे रंगदार
कवितेच्या एखाद्या जातीसारखा, कल्लेदार
अन् गल्लेदार, त्याला हजारोंची कास्ट
पडद्यावर गजबजणारी, त्याचा वेग फास्ट
फिल्मसारखाच. क्लोजअप, लाँगशॉट पल्लेदार.

कित्येक रंग पाहिलेत मी फक्त बाजारातच
अन्य कवितांतले. जसे कित्येक सिनेमातच
डोळ्यांना दिसतात. द्रष्ट्यांची भिंगं
असावी लागतात शीघ्र इतर सर्वांहून
असे रंग टिपायला. जसे मुंडीछाट कोंबडा
मरणावर विश्वास बसायच्या आत उधळतो.
माझेही धड होते डोक्यापासून अलग
बाजाराचा विचार करताना. एक ना धड
भाराभर मस्तके तशी खाटकाच्या बुंध्यावर.
वास्तवाहून भडक जसे वास्तववादी टेक्निकलर
विस्तववाद्यांच्या कवितेत. डोक्यात राख
घालून जे बघतात अव्यापारेषु व्यापार
बाजारातले. माझ्यापुरता म्हणाल तर
नाही ठेवत मी विश्वास कोंबड्याच्या पंखावर
तो जीवनमरणाच्या दरम्यान तडफडत नसताना

टेक्निकलर आजारात वावरतायत प्राण
अधिक ताजा निसर्ग धुंडाळत, कमी निष्प्राण
मासळीमागचे महासागर धुंडाळत
आठवत अधिक तुरेबाज कोंबड्याचे उड्डाण
□

## ९. शहरे : गर्दी

विराट रेल्वे स्टेशन : हिरवट करडे फत्तर,
काळपट तुळया, काचेची निळसर तावदाने,
पिवळे उजळलेले घड्याळ, रोमन आकडे,
वर्तमानपत्रांचा स्टॉल, होल्डॉल्स, पेटारे,
भुयारी कोलाहल मळकट प्रकाशात
आणि हिरवट चेहरे प्रवाहातले.

होऊं दे गाण्यासकट नरक गहिरा
इथे नाही कोळसा, इथे नाही हिरा
फक्त उच्छ्वासांचा धूर पांगणारा

समुद्रासारख्या गलबल्यात :
क्षणाक्षणावर लेबल लावीत
निराळ्या गावाचे; जरा कर घट्ट
मन पोलादी रुळांसारखे, वाच
बारीक अक्षरांतले वेळापत्रक पुन्हा.

शहरांतून निराळ्या शहरात
लोखंडी पुलांवरून चालतात
गर्दीचे लक्षपाद कीटक : तू एक पाय
अनेकांसकट हालणारा : तू एक पाय
विचार करणारा, सूज्ञ आणि अनवाणी,
पण पायच फक्त. लक्षपाद गर्दी
सरपटते शहराच्या पोपडे पडलेल्या
विराट दालनात. शिरते सिनेमागृहात
लक्षनेत्र, एका रुपेरी पडद्याला
चिकटून बसलेली. तुझ्या पायाचे
विस्फारलेले बुबुळ जडते प्रवासी
कहाणीवर. पापणीच्या उघडझापीत
पालटतात दृश्ये. तू चाचपतोस
गर्दीचे लक्ष खुरटे स्तन. तू फिरवतोस
गर्दीच्या मांडीवरून आपला तळहात
तुला रडू येतं स्वतःच्या गर्दीला गुदगुल्या होताना.
□

## १० शहरे : एकांत

डोळे पिंक टाकतात आर्द्र कटाक्षाची
गुवगुबीत गुलाबी प्रणयशय्येवर
भान आल्यासारखं खोल जातं आकाश
खिडकीपासून दूर, छपरांपासून लांब

बोक्यासारख्या आळसात तू बघतोस
रविवारची जांभईवजा सकाळ
तुझ्या पट्टेदार पायजम्यावर फुटते
गुरगुरणारी विद्युन्मय लव

क्षणाक्षणाला वाढत जातात
विसळल्या भांड्यांचे आवाज
पडतात तुझ्या आळसाला भोकं
सूर्याच्या संथ किरणांनी, हळू हळू.

स्वप्नांवर लावलेली टक काढून घेत
तू डोळ्यांनीच चूळ टाकतोस
ओशट दृश्यांची खळखळून
ताज्या स्वच्छ सूर्यप्रकाशात

एकांत रविवारसारखा अलिखित
आणि जन्नतच्या हकीकतीसारखा
रम्य. तुझ्या पट्टेदार पायजम्यात
तूही आळसलेल्या वाघासारखा
मिशी चाटतोस : वास्तवाकडे पाहून
□

११.

अचानक काळोख भ्रष्ट करतो तुझा उजळ झोत
आणि झिरझिरीत प्रकाशात नाचतात नग्न सावल्या;
भडकतात मोरांचे पिसारे सर्वत्र अवकाशात
राशिचक्रांच्या ठिणग्यांत नाचतात नक्षत्र-बाहुल्या;
ओठ लावावा तो समुद्र; डोळा भिडावा ते आकाश;
स्पर्श करावा ती पुष्कळ पृथ्वी; ऐकावा तो प्रकाश;
अशा लखलखत्या आणि लाख देखाव्यांची वजाबाकी
पापणींत करतेस तू : आणि फुटते लाट
रक्ताचीं माणकें उधळीत भर समुद्रात.
मला न दिसले दिसण्याचे वळण, ऐकण्याचे मळसूत्र,
पाण्याच्या मण्यांत निथळताना तू. मी पाहिली रात्र
तिला नव्हते काठ, फक्त होता तिच्या प्रवाहात भोवरा.

□

२२४९१
काव्य
२३८५

## १२. रिकामे दालन

कदाचित् या दालनाच्या अरण्यात
रात्र उगवेल विषुववृत्तावरल्या वनस्पती
वेलींची सजीव आतडी, वृक्षांच्या मांड्या
झगमगती विराट फुलपांखरे, दुपारीत
आमच्या श्वासांच्या ओल्या दमट काळोखात.

कदाचित् ह्या दालनात वावरतील कीटक
जहाल विषारी शतपाद; करतील डंख;
कदाचित् फाकतील नरभक्षक फुले पाकळ्या;
हे दालन जेव्हा पसरेल आपला उग्र पंख
सघन, उन्मत्त रात्रीत, जसा घुमणारा शंख.

आणि तरी ह्या क्षणी हे रिकामे दालन,
त्यातले प्रत्येक चित्र मुके, प्रत्येक फूल मुके,
त्यातला प्रत्येक प्राण स्वस्थ; अक्षर अवकाश;
त्यातला प्रकाश अचल; त्यातल्या छाया स्तब्ध;
हे दालन फक्त बीज ह्या क्षणी स्वतःच्या अरण्याचे.

□

## १३. "क्ष" परिमाणांतून

प्रकाशाचे निनाद येतात काळोख्या कानांवर
उभे राहते कर्णरंध्रांवर किरणांचे आर्किटेक्चर
तल्लख तळपत. पसरले जातात सर्वत्र तंतू
भोवताली, उभे आडवे, व्यापीत चराचर.

मी लखख उभा ह्या किरणांच्या घोषात
रंगांच्या कल्लोळात वितळत वितळत
वितळत अंगांग. आंधळा अदृश्य
मीच आरपार झालोय मला दृश्य

ह्या अपूर्व संध्याकाळी कर्णरंध्रांतल्या.
प्रकाशाच्या सरोवराच्या तळाशी
पडलेत माझे डोळे होऊन माती
मिळालेय माझे सर्वांगच जळाशी

ह्या उजाळ्याच्या. ही विराट श्रुती
किरणांनी श्राव्य केलेल्या वाहत्या स्तब्धतेची
कुठे कोरावी लेखणीच्या अंधाराने कृती
तीत मी मानवी कोलाहलाची ?

आणि ह्या किरणांची कर्णोपकर्णी
होतील कशी बाळबोध आनंदगाणी ?
लिहिण्यापुरता काळोखाही उरला नाही
ह्या सघन, सनातन, स्वायत्त संपूर्णी.
□

१४. संध्याकाळची आवाहने

१

बाक सिमेंटचे का असेना, समोर क्षितिजावर
संथ अक्षत परतत्या पाखरांची दिसते
आणि समुद्रावर राखी, हिरव्या, लाटांची चुरगळ.

खरा तेवढा जिभेवरचा खारा दाणा
नव्हे थोडा अगोदरचा तिथलाच शब्द
नको ठेवू विश्वास विरघळणाऱ्या वाक्यांवर
पहा, ऐक, श्वास घे ह्या बदलत्या हवेत
ठेव डोळे स्थिर पालटत्या सांध्य रंगांवर.

तुझे प्राण आहेत कोरडे आणि रंगहीन, गंधहीन,
स्वादहीन, ह्या संध्याकाळी. हा समोरचा बांध
करड्याच रंगात सतत बदलणारा, बघ,
बघ, ही रोजच वरखाली होणारी वाळू,
अनेकांच्या पायदळी, अन् जीव
स्वतःचाच – हळूच पालटताना आकाशाबरोबर.

२

पहा, समोरचा तेजाळ अवंढा खाली उतरताना

आरक्त करून गिळणारा घननीळ कंठ
तुझ्या हार्दिक रूपकांचे पसर आता पंख
ह्या सनईसारख्या सोनेरी हवेवर, क्षणभर
मग मिटून उघड डोळे, पहा काजळले खवले
दूरच्या रुपेरी लाटांचे. ये परत वाळूवर.

विशिष्ट तंबाखूचीच यावी तलफ
तसं झालंय मनाला, पण ते जा विसरून
प्रयत्नाने. वाळूतले किल्ले
ढासळलेत आता. परतलीत मुले.
उरलीत थोडीफार जोडपी दूरदूर,
योग्य अंतरावर, पुरेशा अंधारात.

आता माडांची सळसळ पडतेय कानांवर
प्रथमच. कालच्यासारखीच. भरतीची वेळ
मात्र बदललीय आज. आता घट्ट हो
विरजण लागल्यासारखा. घे वेध स्वतःचा.
दिवाबत्तीचे आणि काळोखाचे पट्टे पडलेला
घे मनाच्या पिंजऱ्यात वाघ स्तब्धतेचा
फेऱ्या घालणारा अफाट नैसर्गिक अरण्यात.

३

स्मरणातल्या संध्याकाळी सहजगतीने रात्री होतात
प्रत्यक्षात उजळ रंग होतात भडक, वा काळवंडतात
नसतो नेहमीचा असा एकही स्वयंभू प्रकाश
वस्तूंना. पण प्रत्येक गोष्ट परावर्तित करते
घेतलेला प्रकाश, जरा उणा करून.
आजची रात्र परिवर्तित करते उद्याचा सूर्य.
कित्येक गोष्टी गुप्त राहतात शहाळ्यातल्या पाण्याहून
मनातला अव्यक्त अर्थ जसा अपरिहार्य

आणि संपूर्णपणे आपला. तशी संध्याकाळ वा रात्र
आपली नव्हे. ती बदलते आपल्या छटा
डोळ्यांच्या वेशीवर. मज्जेच्या पटावर
तिचे हातांनी धरलेले हरीण बागडते
वांछिलेल्या हिरवळीवर, भाकलेल्या कुरणावर,
अथवा ते निसटून जाते स्मरणांच्या झाडीत.

४

पिकत असतोस तू एखाद्या फळासारखा
आतल्या आत रसाळ होत, ह्या शांततेच्या
अनादि फांदीवर कलम केलेला. तूच आहेस काळ.
तूच आहेस त्रिताल ज्याच्या परिमाणात
ह्या शांततेचा निषाद, ह्या हवेचा रिषभ,
अन् ह्या लाटांचा गांधार, टेकतात परस्परांत
पूरियाचा आलाप होत. पण हे संगीत
तुझं तुला ऐकू येत नाही. तुझ्या ओळीपासून
फारच दूर कुठे तरी होतात उल्कापात
एखाद्या निराळ्या मनाच्या खगोलात, पुन्हा
हेच सगळं घडताना जसं स्मरणात
आतलं बाहेरचं एकत्र येतं, नाही परकं राहात.

म्हणून जा, जा खोल अधिकच शांततेत
बसल्या जागीच अधिकाधिक रिकामा होत
घे भरून आपल्यात ही संध्याकाळी सुरू झालेली
भावनांची ओहोटी. बघ, ती उघडी पाडत जातेय
वाळूवरल्या वस्तू– आजवर न दिसलेल्या.

५

तुझा ताल थांबला तरी ते संगीत राहिलं होतं
एकसारखं वाहात. तू वर पाहिलंस तर चंद्र

दिसत होता शिंपल्यासारखा, धुतलेला शुभ्र.
वरही पाणीच होतं, आणि होती वाळू,
मग वारा आला एक निराळाच त्या देखाव्यावरून.
आणि रडून झाल्यावर जसं मोकळं वाटावं तसा.
वस्तू वस्तू झाल्या पुन्हा. तू झालास तू.

तू स्वतःमध्येच पळून गेला होतास
आणि निराळा होऊन परत आला होतास.

कोसळली लाट
अन् आता ती ऐकू आली स्पष्ट
तिनेच नष्ट केलेल्या शांततेत.

६

ही परिभ्रमणं ताऱ्यांची, लाटांची,
नाहीत डोळ्यांच्या संवेदनेपुरती मंद
नाहीत ह्या लाटांचे छंद
तुझ्या वाक्यांच्या वैयक्तिक व्याकरणात
कानांवर येतील असे. पण ही नुक्ती कोसळलेली लाट
तुझ्या कानांतच फुटली अन् फेसाळली
तुझ्या प्रतिविश्वातला समुद्र
तिनेच दाखवला तुला.

वाळू झटकून उठलास तू, घड्याळाकडे पहात,
अनंततेची जाणीव होऊन. संध्याकाळ संपून
मध्यरात्रही टळत होती. तुला हवा होता
उद्याचा स्वच्छ दिवस, माणसांची गर्दी,
रोजचंच जीवन. तुझा रंगहीन, गंधहीन प्राण
होता पालटला आतल्या आत आपोआप.
□

## १५. दुपार

बुबुळपांढऱ्या आकाशांचा वज्रगाळ द्रव
पापणीच्या पंखात झोपलेला अनादि विखार
आणि मनुष्याचा जागा झालेला जाळ. पेट घेतात
पाकळीपाकळीने उमलणारी दृश्ये कालातीत.

एका विराट स्फोटाचा बिंदुवत संकोच मी
दुपारींच्या विशुद्ध समुद्रभरतीत गारद होतो
आणि पालवीच्या लाटांवर लाटा येतात
मातीच्या काळोख्या अन् उष्ण गर्भाशयात.

थेंबांची झालर लावलेली झापड लाटेवर
आणि गडप झालेला अवकाश खिदळून येतो पाण्यावर
अविरत मैथुनाचे प्रकट अंग आम्ही
त्याच्या अप्रकट लयीतच गुदमरून मेलेले ..

इंद्रियांचा पंचरंगी पोपट उच्चारतो वाक्य
पिंजऱ्यात पाठ केलेलेच; इंद्रियातीत मध्यान्ही.

□

## १६ इथिओपिआत रँबो

एखाद्या आत्मचरित्राच्या कच्च्या मातकट रंगात
क्वचितच प्रकटतो असला उजळ काळोख
अगम्य जखमेला समृद्ध करणारा
जसा आपल्या दोघांचा इथला वास, भौगोलिक.

मला दिसतात अजून इथे तू ठेवलेली भोके
शिल्लक ऋतूंत आणि एकंदर वातावरणात;
तुझ्या मज्जेच्या भूगर्भशास्त्राचे विवेचन
आहेच केलेले पाठच्या टीकाकारांनी. रँबो, मी ऐकतो,
तू लिहू न शकलास जी जी कविता
बंदुकांच्या व्यापारात गढल्यामुळे.

नशीब आणि कविता यांचा अनौरस पुत्र तू!
तुला फक्त वस्तू दिसल्या
स्वतःत रूपांतरित
पण तू इथे आलास तेव्हा
तुझा रूपांतरकारी रोग झाला एका शापामुळे बरा.

तुझ्या इंद्रियांना होते करायचे घर
भाजलेल्या मज्जेच्या ह्या सूर्यविणीच्या देखाव्यावर,
आत्म्यातून उत्पन्न झालेले एक अर्ध-वाळवंट
उंटाच्या शेणाची त्यावर विरामचिन्हे
—ही तुझी शेवटली कविता.

स्वतःचेच सत्य हरवलेले
तुझे शरीर इथे भटकले
एखाद्या असाध्य ग्रंथीप्रमाणे केला
सूर्याने आणखी थोड्या दिवसांचा स्नाव
तुझी कुंडली विझली होती. इतर चरित्रांनी
त्या ग्रहांची मालकी घेतली. तू फ्रान्सला परत पळालास
उपदंशाने भग्न केलेली नष्ट जीभ घेऊन.

परत, परत फ्रान्सला—
जिथे कवी सोडतात प्राण व्याधिग्रस्त जननेंद्रियांनिशी.

□

## १७. चंद्र आणि खेचर

चरतात एका फाळलेल्या माळावर
अंधार समजून गवत प्राणिमात्र...
रात्रींत विरघळते माझे ढेकूळ
आसमंत गढूळ करीत. पण मग स्वच्छ
होतात माझे डोळे पाहून उजळ
चंद्र आणि एक मुग्ध झालेले खेचर
स्वतःच्या सावलीवर...
पाण्यात चांदण्याने रडलेलं अक्षर
मासोळीची लाटभर ओल होऊन
पोहतंय माझ्या गळक्या ढेकळाच्या
गढूळ आसमंतात... अशी वेळ.
आणि गवत समजून स्वतःच्या सावलीचं
खेचर चांदणं चरतंय...
माझी माती वसते जाऊन रात्रीच्या तळाला
मासोळीच्या सुळकांडीची लाट पकडतो
प्रत्यक्ष अवकाशाचा गळ

चंद्र समजून मी पाहिलं
त्या मुग्ध खेचराचं चरणारं चांदणं.

□

१८.

वाहतात नरकाच्या हिरव्या प्रकाशात
या पावसाळी रात्रीच्या शहरात माझे डोळे
चिंब विजेत न्हालेले पिशाच-वास्तुशिल्प
कल्लोळते वातावरणाच्या लहरी भिंगात
उगवतो प्रकाशाचा एक ठिपका माझ्या शरीरात

आणि माझी छाती कासावीस होते
मी शोधतो माझ्या पापण्या काळोखात
आणि माझे शरीर इथे अनोळखी होते

शून्याच्या भोवऱ्यातून वाहतो काळोखाचा पूर
माझ्या शरीरात. आणि धुतली जातात
माझी शुभ्र विस्कळित हाडे, हरवतात
विझलेल्या काड्यांप्रमाणे. या रस्त्यावर

मी विखुरतो एखाद्या आत्महत्येच्या बातमीप्रमाणे
आणि आकाशातून होतो शीर्षकांचा वर्षाव ..

□

## १९. सत्ताविसावा वाढदिवस

कुठेतरी शरीराच्या
बेदम वापराच्या धसलेल्या
किनारीवर, ह्या वाढदिवशी
मला सापडलाय एक अर्थ.

कुठेतरी प्राणाच्या
नियमित दुर्वर्तनात
ह्या वाढदिवशी मला गवसलेय
कवितेची नितळ रफू

कुठेतरी माझ्या हृदयाच्या
फाटक्या वरच्या खिशात
लागलाय माझ्या हाताला
प्राथमिक शांततेचा धागादोरा

ह्या वाढदिवशी माझा मूळचा
कोट जास्तच मळलाय,
विरलाय, ओळखूही येत नाहीय
जसा मी गाठतोय

ह्या वाढदिवसाचा अंतिम रोध
वास्तव – विरून उघडलेलं एक पोत :
आणि पुन्हा एकदा मी हाताळतोय
मर्त्यत्वाचा कापूस कच्चा
लक्षपूर्वक.
□

## २०. चिमणी

१

झुलत्या निष्पर्ण फांदीवर समोरच्या
क्षणभर बसली होती क्षणापूर्वी चिमणी
माझी लवताच पापणी
उडला मोतिया आकाशात तिचा मणी.
माझी लवते आहे तेव्हापासून
एकसारखी पापणी.

२

माझ्या पापणीतला मणी
मोतिया आकाशात जसा एक अश्रू
कुणाचाही असावा
चिमणी जाताना उडून, अचानक
जी दिसली चांदणी
आकाश पुन्हा नेहमीचेच निळे होताना
जशा चमकतात आठवणी

३

माथ्यावर हेलकावते सदैव-शिशिराचे
शुभ्रतरल झुंबर
जसा फुलाशिवायचा गूढ उंबर
माझ्या ओळींमध्ये सतत सळसळतो
जसा सततचा अर्थ मावळतो
ओळखीच्याच अपुऱ्या अचूक शब्दांत

४

उद्या दुपारी हीच चिमणी
पुन्हा ह्याच झुलेल निष्पर्ण फांदीवर
उद्या दुपारी हीच चांदणी
झोपी जाईल प्रकाशभरल्या आकाशात
ओवीन मी तरी एकेक मणी
चांदणीचा, चिमणीचा, आठवणीचा
माझ्या ओळीच्या सळसळीत.

□

## २१. दीर्घ

१

स सापाचा; क कमळाचा; ल लहरीचा – सकल
सळसळतात पाकळ्या पाण्यात तेही सकल
झाडे सुगंधात वाहतात तेही सकल
आणि शिशिराचे पराग काठोकाठ फुलांत.

हिमाचा वर्षाव गोठलेला मध आणि सृष्टीचे निर्माल्य
ज्या शब्दाच्या शुभ्र, थंड, निर्जळात पडतात प्रतिबिंबे यांची
तो माझा शब्द उजळ, ध्रुव, ओसाड.

काळोखातून ज्याच्या अक्षांवर बहरतो अंतिम ऋतु
तो गुप्त प्रकाशही ध्रुव, त्याची फुले सदैव ताजी
अगोचर वृक्षांची गहन अरण्ये, सुगंधांच्या राजी,
पाण्याच्या सहस्र पारदर्शक पाकळ्या उत्फुल्ल
आणि या सर्वांवर एक अचूक डंख, उमलण्याची लाट,
माझा शब्द साप, माझा शब्द कमळ, माझा शब्द लहर.
माझा शब्द सकल आणि प्रत्येक सूक्ष्म छटा त्याचे जहर,
त्याची मखमल, त्याचा ओलावा. माझ्या शब्दांत
वादळाच्या फूत्कारांत फुलते महासागराचे इंदीवर.

२

वल्गना अनेक केल्या : धबधबला प्रकाश
डोळ्यांवर. परमेश्वराला हद्दपार करून
मी माझ्या हृदयाच्या कठिण उजळ रात्रींत
रोखले झगमगणारे शहर; शहारे विजेचे...
आणि कोरडे वळसे पाण्याच्या जन्माचे...
मी पाहिले विस्तवी विस्तार स्वतःच्या काळोखाचे
आणि प्रकाशासारखी राख विझण्याची
झाली कात नजरेला. माझे हृदय सोलीव नागडे...

३

दीर्घ, दीर्घ अक्षरांच्या गजबजलेल्या वाहतुकीत
सनातनाचा व्यापार होतो. दीर्घ, दीर्घ,
विरामांच्या शांततेत क्षणांचे व्यवहार थांबतात.
□

## २२. एक अनंग वेष

कणांतून उत्सवली एक रेष
तेवढ्यानेही होईन मी सुखी
[illegible] आनंदाहूनही तलम वेष
अंग विसरून घेऊन जन्मभर आकाश होईन निर्विशेष
ह्याला म्हण वैराग्य म्हण निस्संगपण निस्संकोच
माझा हर्ष वळतोय माझ्यातच थेट, थेटवर पांगतोय
ह्याला म्हण आभास हाच निव्वळ निव्वळ उल्हास
मीच ऐकतोय मीच ऐकतोय केवढा सरळ माझा श्वास
केवढं सरळ हे सरळणं हे बरळणं ही सराईत सुई
निर्लावण्य निळाईत हळुवार सलगीची शिलाई.

कणांतून उत्सवली एक रेष
तेवढ्यानेही होईन मी सुखी
आनंदाहून तलम एक अनंग वेष ...

□

## २३. आठवण होते तुला तसं एकदाच पाहिल्याची

खोलवर मनाच्या शहारलेल्या शांततेत
त्या एकांत मलईच्या ओल्या बर्फीखाली
मीठं होतं माझ्या गर्भशार दुःखाचं काळं पाणी.

तुला तसं आठवतो पुन्हा उठतो स्मरणात गुन्हा,
गहाळ होतो जागच्या जागी कपाळावर ओठांच्या घड्या घालून,
पिंपळतात चंद्रबिंबांची स्तब्धकल्लोळ आरस्पानं पुन्हा.

तुझं लालसर गरम अंग, तुझ्या उन्हाळ पाठीवरून
सैल कोसळलेले काळेभोर मोकळे केस, कालातीत सायंकाळी
एकदाच जशी पाहिली तुला माझ्या जन्मेच्छू डोळ्यांनी

ते आता अंधूक झालेले तळहात आणि आघात, तो मलूल
सोनमणी तुझ्या गळ्याशी विलय पावलेला आणि माझी अस्पष्ट
नकळत उच्चारलेली हाक, माझ्या शरीराच्या दिपलेल्या कानठळ्या

तुझ्या बांगड्यांची किणकिण माझ्या त्वचेवर उमटलेली तशीच.
आठवतो भराभर सरोवरांचा आणि तळ्यांचा सारासार विचार करत
रक्तांतली एकच मल्हार लहर : उन्हकाळा पाऊसगर्द ज्यूस.

वर्षानुवर्षं स्मरणाच्या पाण्याखाली कुजून गेलेल्या काष्ठ वखारी
पुन्हा अरण्यमय होतात त्यांची काळसर हिरवी जिवंत अस्तरं
तुझ्या तेव्हाच्या अंगावरून आताचीच ही थंडगार बोटं फिरवीत
मी चाचपडतो माझ्या तेव्हाच्या गुन्हेगार कातडीची उष्ण लक्तरं.
□

## २४. विस्मरणात लिहिलेली प्रेमकविता

वर्षानुवर्षं मागे मागे गेलो ओहोटत स्वतःत
आणि आठवायला गेलो तेव्हाचे एकमेक
कदाचित् पाऊस पडत असेल वर्षानुवर्षांपूर्वी
कदाचित् वर्षानुवर्षांपूर्वी असेल स्थिर दुपार
प्रसंगाच्या रेषा स्पष्ट आहेत पण अंधूक
आहे मीच वर्षानुवर्षांपूर्वी कदाचित् मीच नसेन
कदाचित् मी मीच नसेन आत्ता खूप वर्षांनंतर
कदाचित् मीला मीच समांतर तूला तूच समांतर
वर्षानुवर्षांपूर्वीचेच रस्ते, गल्ल्या, समुद्रकिनारे
आणि हृदयात भयंकर मोजकं एक सूक्ष्म अंतर
जिभेवर जिवंतपणाची जी नांदली, झोंबली चव
ती नव्हती गोड, नव्हती कडू, नव्हती तिखट किंवा आंबट
वर्षानुवर्षांपूर्वी हसऱ्या आणि तरल विटांनी
आपण रचत होतो एकमेकांची हीच चिरेबंद कबर

☐

## २५. खुर्ची

अवघड असतं संपूर्णपणे एकटं होतं सर्वस्व तेव्हाही
एकुलतं एक होऊन खुर्चीवर बसणं
अनारंभ आणि अविरत इंद्रियधनुष्यातली
एकही छटा कापून न काढता
स्वतःच्या अस्तित्वमग्नतेचं सातत्य टिकवणं.
विसरून जाणं ब्रह्मज्ञानाची सगळी कात्रणं
आणि प्रातर्विधींचं सगळं टाईमटेबल.

लाकडाची असूनही खुर्चीसुद्धा खायला येते.
काळाच्या आढ्याकडे टक लावून
मी तिच्यावर बसलेला असतो तेव्हा.
कॉंक्रीटच्या असूनही भिंती ॲब्स्ट्रॅक्ट होतात
रीइन्फोर्स्ड् असूनही डोळ्यापुढे गढूळतात.

मी आमरण खुर्चीवर बसून राहाणं अशक्य आहे
हे कळतं. पाठ टेकायलाच हवी हेही कळतं.
खुर्ची कठीण असते
तिच्यावर बसणं अवघड असतं
आपण कोणाची भूमिका करतोय ते कळत नाही
फक्त आपण माणसाची भूमिका करतोय्—
एवढं अंधूक ठाऊक असतं.
एकेका संस्काराचा निरास करायला लागतो मी
आणि खुर्चीसुद्धा नाहीशी होते
अनारंभ आणि अविरत इंद्रियधनुष्यात
वर्ण एकेक एकमेकांत वितळून जातात
उत्तुंग मग्नतेत होरपळल्यावर पुन्हा मी
थोडासा शुद्धीवर येताना
सर्वस्वाची विराट खुर्ची झालेली असते माझ्या.

□

२६.

जिवाशिवाची सुई
एकाग्र सफाईने घालते
जन्मोजन्मीचा टाका
मौन कापड शांत धागा
माझी सर्वस्वी शिलाई.

घट्ट वीण
जसे परस्पर
तळहात
हास्यात
रहस्य
चमकून गेलेले दात
जशी मांडणी.

आता नेढ्यात
ओवला
कृपेचा झरा
सगळा स्तब्ध
पसारा
टकमक
पाठमोरा.

□

२७.

पाच पाचूंचं पाणी
पाणी होतं जिथे
हिरे होतात मऊ
गहिरे
ज्या स्थळी
सततची सुई लागलेली जिथे संकेत
उघडते एकेक ध्वनिमुद्रिका
एकेक पांढरा कबुतरांचा मुका हलाल

रक्ताळतो ज्या स्थळी
काढून टाकतो बूट आणि यात्रा
वेगळे करतो तळपाय
मोकळा जन्म
ज्या वेळी
नसतं कपाळ
फक्त
गर्द
निराश
वैधव्य
धवल दाही दिशांचं
नसतं कळणं
फक्त
विरळ
मावळणारं जावळ
स्पर्शांचं
नसतो स्पर्श
फक्त
विखुरतात
काही जर्द कण
ओळखीचे.
नसते ओळख
शुद्ध
बुद्ध
फक्त
त्या ठिकाणी
लागलेली असते
बधिरात
एक सततची सुई
□

## २८. कलंडणाऱ्या शांततांमधून

कलंडणाऱ्या शांततांमधून
भोवळणारे शब्द
उन्हं, माध्यान्ह उन्हं
काळवंडणारी
पिंपळ, पिंपळ
पानं. पानं
काळोखणारं शुद्ध सोनं
झोकांडणारे पाय
ह्या भरभरून येणाऱ्या हवेत
ही सुन्नतेची सोसाट्याची सर्वांगभरती
डोळ्यांतलं मालवलेलं जहर
अंगापासून दूर दूर जाणारे हात
छातीत वाढणारा डोह
आणि भररस्त्यावर
गर्दीचा गच्च झालेला गेंद
माझ्या निरुपायावर, झोकांड्यांवर
सात घिरट्या घालणारं
भवभोवंड.

□

२९. स्क्रू

हा जन्म स्क्रू
मी वळलेला तुझ्यात
खोलवर
गच्च तुझ्या लाकडी
बधिर अंगात, मनात
एकाग्र
चक्राकार टक लावून
पापुद्रे भेदत
आणि स्थिरावत
वक्षावरल्या अभावित
हाताप्रमाणे
हार्ट ॲटॅक येताना

मी उभा आहे
निष्पर्ण, काळ्या, वेड्यावाकड्या
एका निश्चल फांदीखाली
जगाचं रंगरूप ओसरलंय पुन्हा
तू आठवायलाही
मला कष्ट होतायत
आठवतोय फक्त
जन्म रिकामा करणारा एक आवेग
आणि सगळी इच्छाशक्ती खिळून
झालेला हा स्क्रू
एकटक चक्राकार
रोवलेला
तुझ्या लाकडी अस्तित्वात

मी घुसतोय
विश्वरचनेच्या लाकडात
मी भिनतोय
जन्नत आणि जहन्नमच्या
टिकाऊ फर्निचरमध्ये
मी रुतून बसलोय
ह्या निरर्थकात
खोल आणि गच्च

आता हे मळसूत्र
पापपुण्याचे पापुद्रे भेदून
भिडतंय
प्रेमाच्या भिडस्त गाभ्याला
अशरीर.
□

२२५०९ ५१०८५ २३०८

३०. सिंफनी तिसरी

मी
एक दरवाजा
अवकाशात उघडलेला
घळघळती तीव्र शेंदरी रेघ
निळ्या शांततेत
न वाकडी
न सरळ
न वळसा घेणारी
गच्च
मुक्त
तीव्र
जशा माझ्या फाटक्या
शरीराच्या चपला काढून ठेवून
तुझ्या जननेंद्रियाच्या चितेवर
मी अग्निप्रवेश करतो
तशी एक
फक्तगच्च मुक्तबंध कल्लोळती बारीक रेघ.

एकेक शब्द
मी उतरून ठेवतो
अंगमुक्त होत
माझे बांधबंधारेसुद्धा
बेहोष होतात
रूपहीन
हा माझा शेवटचा ओघ
प्रकाशात आणि अंधारात
सतत निवळणारी
ही उद्युक्त रेघ
फक्तगच्च
फक्तगच्च
देठातून
भळभळणारी फुलं...

रिकाम्या तळहातात
सगळ्या जगाचा भार घेऊन
एवढ्यामोठ्या डोलाऱ्यात
गाभाऱ्यात वाढणारी
तीव्र टोकदार रेघ जपून
आता आणखी
कुठवर सदेह ?
नक्षत्रांच्या निवडुंगांखाली
आपली नागडी शरीरं
घवघवीत हिरव्या गवतात
बागडली
वर चांदण्यांच्या आभळी होत्या
खाली दगडगोटे
एकमेकांत आपण भळभळलो
भोवताली

भस्म होतं
भस्म होतं
संवेदनांचे विक्राळ पट्टे होते
अवकाशाचे पिंजरे होते
तू मी मिळून
एकच पिपासू
बंदिस्त पशू होता
एक हास्यकल्लोळहुंदकाडरकाळी होती अन् नंतर
जगाची डहाळी
वाकली होती
आपल्या
चुंबनाच्या तळ्यावर
पण दरम्यान
एक शांत
अनारंभ आरोळी होती
मधे पूल नव्हता
फक्त जेट विमानानंतरची
घनांध शांतता होती
आणि एक अंगोपांग फैलावणारा
पखवाज होता
धमन्यांवर चढलेल्या
धमन्यांत.

एक शरीरांची संक्रांत
रक्तमय क्रांती आणि अराजक
एक झांज
पहाट, तिन्हीमांज ..

घण घण
घण घण घण घण

टांच्या घंटा टोलवतात
भरतीओहोटीचं
खोल देऊळ
उभारते आणखी कोसळते
ढासळते
फेसाळते पूजा
त्या मांसल, तट्ट त्रिकोणावर
काळं गवत थरारलंय
मधोमध लालसर जांभळे
स्फुंदणारे ओठ
एक गव्हाचा दाणा
सत्त्वगच्च ताठरलेला
मी बोटांनी; ओठांनी शोधतो
श्लीलतेचं
काळंभोर परम-बोंड
जणू वादळी काळोखात
प्रत्येक पीस आगीसारखं फुलवून
एक कोंबडा फोफावतो
चंद्राच्या कोयत्याखाली
मैथुनाच्या बुंध्यावर
जन्मस्थानी
वधस्थानी
साक्षात्

स्पर्श
सुरीसारखा पहिला स्पर्श
जेव्हा जन्मजन्मांची पाती पेरली जातात
मैथुनाच्या जात्यात
कोसळतात मूठ मूठ आंधळे जोंधळे
रगडली जाते जाणीव

पिठूळ वज्रगाळ
एकमेक
सांडतात
भरडत्या
दगडामधून
जगभर
ऐकू येतेय् मला
एक ओवी
एक तंत्र आणि कोडं
कानांवर मुक्यानेच
रांगोळी घालणारं

अणूच्याही आडून
आरोळी आरंभत येताना दिसते
एकच लखलखती वेदना येते
आणि जन्माचं कुंपण घालून जाते
एका रिकाम्या काळ्याभोर
सताड डांबरी रस्त्यावर
भरधाव मोकाट एक मिल्क व्हॅन
दुधाची वाढती थारोळी सांडत
निघून जाते
तुझ्या रक्ताला दूध येतंय्
माझं अंग चिंब झालंय
चरित्र शर्टासारखं चिपकलंय मला
अनपेक्षितपणे न्हालोय
कुडकुडतोय
ह्या तुझ्या अमानुष प्रेमाच्या थंडीत
गळ्यात रुळणाऱ्या नररुंडमाळेतलं **एक** तोंड
तुझ्या स्तनाग्राला भिडलंय…
□

## ३१. सुनीत

असे अश्रूही आता नकोत, जे डोळ्यांचा
पाणउतारा करतील. हवेत डोळ्यांतून
ओघळलेले डोंगर, डबडबलेले खडक,
हवंय एक अंतर्बाह्य खोदकाम सैल मुठीचं.

हवाय् एक नष्ट झालेला निसर्ग, आणि
एक अर्ध्यावरच सोडून दिलेलं मशीन;
पेंढा भरलेला गरूड नाकारून मी
आता स्वीकारीन भुर्र् उडणारी चिमणी.

हवाय् एक इतिहासात हरवलेला हत्ती
आणि एक भूगोलात न उल्लेखलेला वारा
हवंय एक सबंध पुराण भविष्यकालीन.

सगळ्याच्या सगळ्या मी वेगळ्या करतोय
माझ्याच अस्तित्वाच्या सुतळ्या. बांधतोय
मुकाट्याची नवी नाती, सोसाट्याची गोती.
☐

३२.

स्वच्छ पाण्याखालच्या रंगीबेरंगी गारगोट्याही
असतात अत्यंत दुर्बोध, किरणांचा व्यूह
जसा बदलत जातो, जसे छायाजाल बदलते,
जशी गवतावरली इवली फुलं स्तब्ध होतात
दोन झुळुकांमधल्या विरामात, पाहणारे डोळे
चकित झालेले वावरतात ह्या रंगांमधून.

दुपारच्या कठोर प्रकाशात अधिक कठोर
शुभ्र वस्त्रांत लपेटलेले तुझे स्तन, शुभ्रच
संगमरवराच्या आविर्भावात तुझ्या उभ्या मांड्या
संध्यांकाळची अपेक्षा करणारे तुझे डोळे
हिरवळीवर हिंडणारे; नाहीत तेही सुबोध
इतर दृश्यांहून. ह्या कलंडत्या शांततेत

माझ्या हृदयातल्या. लिहिल्या आहेत लाटा
किरणांनी तुझ्यावरही. बदलते छायाजाल
तुझ्याही अंतरंगात. गवतावरल्या फुलाहून
नाजूक हेलकावा तुझ्या मनात थांबलेला
□

## २३. तीव्र कोमल निळी सिंफनी

१

एका स्वप्नात चंद्राच्या पाठमोऱ्या बाजूचा उदय
शुक्लपक्षातल्या विवरासारखा. कावळे ओरडणारे
चांदण्या रात्री चुन्यासारख्या चंद्रप्रकाशात
राखेचे डोंगर आणि सर्वत्र सुन्न; आकाश अदय.
रात्रीच्या निराकार लाटेत
गुदमरलेला मी
रात्रीच्या निराकार
मी लाटेत गुदमरलेला
मी निराकार
गुदमरलेल्या रात्रीच्या
लाटेत
एखाद्या ग्रहासारखा थंड, लपेटलेला
वाहत्या निराकारात
ताऱ्यांचा निळा विस्तव विखुरणाऱ्या
स्वप्नाच्या लाटेत

पापण्यांच्या पाण्यात गुदमरलेला
जसा जाणिवेचा निराकार स्वप्नांतल्या.
मोहनिद्रेत जागा मी
चांदण्यातल्या स्पष्ट दगडांवरून चालत
अनोळखी झाडांच्या पाचोळ्यावरून
मांड्यांसारखे नितळ झाडांचे बुंधे
निष्पर्ण, हातांसारख्या फांद्या,
हाकांसारख्या वेड्यावाकड्या फांद्या
आणि चालतोय मी ताऱ्यांच्या विस्तवावरून
पाचोळ्यावरून, पाण्यावरून, दगडावरून
लाटेतून मोकळा झालेला
ऋणमुक्त हवेत
मी गेलोय स्वतःचीच सावली ओलांडून
काळे-पांढरे पुंज अंगावर घेत
बेनाम बेहोशीत.

२

तरंग तरंग तरंग
सर्वत्राचे तरंग
अदृश्य केंद्र.

कुठे विझल्या जाळाचं पाणी
कुठे स्मरणातला पारवा मणी
आंधळी, बघती, सरोवरं मेलेली
निजलेले रंग पाण्यावर
नाव नसलेल्या जागी
निरक्षर रात्रीत ताऱ्यांपलिकडच्या तू
स्मरणांचे तंत
विस्मरणात थरारलेले
मला दिसली क्षणांची कोर, तिचा वळसा

दोन-चार ओझरत्या स्वरांच्या सरण्यात
कळणारी, विलगणारी, अलगणारी आकाशं
स्वर्गाचा जलसा
झुंबरांचा लखलखता वळसा
काळोखात दिसेनासा
मग शुभ्र गुलाबाचा वास
आणि निळ्या विस्तवाच्या दवाचा उदास
पापण्या—पाकळ्यांवरल्या अभिप्राय
कातडी बांधणीचा खोटा पडलो मी
पुढल्या जागत्या क्षणाला
ओसरत्या निजेची लाट
ठेवून गेली मला रात्रीच्या किनाऱ्याला.

३

स्वर्गेंद्रियाच्या संवेदना
कांद्याच्या छेदासारख्या शुभ्र, सरेष.
कदाचित् स्खलनाच्या क्षणी
जसा रक्ताचाही प्रकाश
तीव्रकोमल निळा
श्रुती जननेंद्रियांच्या अग्रांवरली
दृश्य मरत्या पापणीवर पालटणारे
नाही पकडला जात
बिननावाचा अर्थ
दोन शब्दांमधली चेतन गती
जसं झोपेतलं भान
तीव्रकोमल निळं
अन् इंद्रियांचे हिजडे
पिटतात अश्लील टाळ्या
केवळ त्या संभोगाची झळ लागून
तीव्रकोमल निळ्या

४

कंठत नाही वैकुंठ मनुष्याचा गळा
फक्त रुळतात तुळशीच्या माळा
आणि भजनाच्या भसाड्या घोषात
येतात भाकडाभिऊ पुन्हा होषात.
निराश शहरी,
मी वास्तवाच्या विस्तवावर चालतोय
माझेही पाय पोळतात, अनवाणी
माझीही भाकडभिऊ गाणी
केवळ विस्तवाच्या विरहास्तव आळवणी

५

मी परतलोय एका गलिच्छ बोळातून
नाक्यावर पानाची पिंक टाकून
मी पाहिलीय एक प्रेतयात्रा
गुलाल ... फुलं ... पेट्रोमॅक्स ... मडकं
मी पाहिलाय एका मुलाचा जन्म.
मी ओढलीय विडी इथे बसून
ह्या फूटपाथवर.
मी शपथा घेतल्यात ह्या विस्तवावर
चालत जाताना.
मी इरसाल शिव्या हासडल्यात
रक्त थुंकत.
झोपलोय् बायांबरोबर, दारू प्यालोय्.
मी चौऱ्याऐंशी आसनं घातलीत
विस्तवावर.
मी सहा भाषांमध्ये प्रेम करू शकतो
मी प्रबंध लिहिलेत ह्याच वास्तवावर.
मी अकालीच म्हातारा झालोय
मनाने.

आणि माझं शरीर
सालोसाल टाकतंय कात विस्तवावर.
विझला नाही अजून कोणताही रस्ता
मी पाहिलीत अजाणत्यांची ओली स्मितं
ह्याच विस्तवाच्या प्रकाशात.

६

जाग सतत येत असतेच
झोप नाही पुरी होत.
पडक्या वास्तूंमध्येही विस्तव वाचतो
चरचरत्या डोळ्यांनी मी.
थंड, काळा स्वर्ग
मला हवा आहे.
निरवधी, विपुल हा विस्तव
काळच व्यय.
थंड, काळा स्वर्ग
कवटी फुटण्यापूर्वी, सशरीर
जागेपणी मला हवा आहे.
मला काय हवंय हे मला कळलंय.
जे कळत नाही ते
विस्तवात न जळणारं.

७

लाटेत गुदमरलेला
निराकार मी
किनारा न अजून
ह्या जागृतीला.
जडपणे हेलकावत
उंचावत, खाली येत,
डोळ्यांसकट बुडलेला

परार्ध रात्रींत
निराश शहराचे
फूटपाथ ओलांडत, भेलकांडत, कलंडत.

८

सगळीच चिल्लर.
सिनेमाची तिकिटे,
कवितांचे कपटे,
मयताचा पास,
ओळखीचा भास.
पेपराचा बोळा,
रबरी साधने,
व्हिजिटिंग कार्ड,
खिशातले चणे,
चष्म्याआडचा डोळा
आवळा अन् कोहळा.
आकाशातला सूर्य,
पोथीतील तिथी,
ग्रहांच्या दशा
अपेशी नशा.
कंटाळ्याचे काटे
फिरतात सदैव
सुखांच्या वर्तुळात.
लाटेत गुदमरलेला
जागा वा निजलेला
कंठाशी कोरडा ...
आणि ह्या विस्तवात
एअरकण्डिशण्ड पावलांनी
कोणी गावी गाणी ?
□

## ३४. लाट

काळोखात अर्ध्या हातावर कोसळली लाट
आणि कान झाले चिंब
उघडताच फुटले डोळे
वाऱ्यावरले तुषार . . .

माझा कुबडा ॐकार
ढासळला किनाऱ्याच्या वाळूत
काळोखात अर्ध्या हातावर
कान कोसळले लाट होऊन
अर्धा हात झाला चिंब.

□

३५.

काळोखाच्या विस्तवी फळाला देतात छेद
जिभांचे सळसळते सुरे : गर्भडाळिंब फुटते
आपला रत्नकोश नग्न करीत : लखलख
भळभळते हिरण्य रक्त विवस्त्र होताना
प्रकाश आणि छायांची ही सुस्पष्ट भाषा
शब्द अस्पष्ट करतात नाकारून सीमारेषा,

ती विराट सतार आम्ही जिच्या खुडतो तारा
पाच पाच लुळ्या बोटांनी : ते सधन शरीर
आणि सघन स्त्रीत्व, ते अशरीर पक्षी
आणि भरारीचे शरीर, वेगाचे स्नायू :
गती आणि वजनाचे पंख लावून
अवकाश आळवणारी सचेतन स्तब्धता.

प्रत्येक चांदणी साक्षर करते जे आकाश
तो शब्द मी : मी निरक्षर दिवस.

□

३६. कष्ट

आता मला सरळ दिसतो रस्त्याचा भयंकर स्पष्टपणा
खुनांच्याही पलिकडची स्तब्धता
आणि खुले कोथळे
शिवायची फुलं
उगाचच जास्वंद
किंवा गुलमोहर
अधिकच लाल
काहीतरी.

आता मला एकेक काळ्या दगडाचा प्रत्येक कंगोरा दिसतो
मला दिसतो भयंकर जिवंत हिरवा गवतांचा प्रयास
मला दिसतात स्नायूंच्या कष्टी घडणावळी
जन्मोजन्मींची वेडसर अचूक घड्याळं
अंगावर येणारे काळाचे काटे
नेटाने फिरणारे डोळे
वस्तूंच्या विरोधांतून
पाची इंद्रियांना
सामोरं येणारं
काठिण्य.

उभी ज्ञानभिंत समोर
समोर. अचानक संपुष्ट
अस्तित्व : तुसडं, गुप्त

मला जाणवतो, आता माझा जबडा कठोर झालेला,
आणि माझ्या हृदयाला होणारे आपोआपचे कष्ट.

□

३७.

आणि कपाळावर लाटा विरून जाताना
एक शेलका मनुष्य, विस्मरणाच्या निळ्या हवेत
काही हिरव्या झावळ्यांत एक नारळ
झोपाळलेला, किनाऱ्यावर.

कानात सूर्यकिरणांचं जाळं
आणि सूर्यास्ताची
फुटलेली लगोरी
समोर.

सगळे हेतू अंधूक होऊन त्यांच्यावर
चांदण्या उगवल्यानंतर
मी गवतात आहे, ओसरणाऱ्या लाटेत आहे, योनीत आहे,
योनीवरल्या केसांत आहे, चंद्राच्या आयाळीत आहे,
नाडीच्या दोन ठोक्यांमधल्या
विलंबित प्रश्नचिन्हात आहे.

कमरेपर्यंत समुद्रात बुडालेली तू
प्रकाशाविरुद्ध शांत तळपणारी तुझी पाठ
तुझ्या मोकळ्या केसांमधून घरंगळून पाण्याला मिळालेले
शहरातले सगळे दिवे, माझ्या चरित्राची सगळी अक्षरं,
आणि मग निवलेल्या वाऱ्यात
कपाळावर लाटा विरलेल्या
एक शेलका मनुष्य–निर्मनुष्य
मी, काही हिरव्या झावळ्यांत
झोपाळलेला एक नारळ
सूर्यास्तानंतर.
□

३८.

एकदा आत्महत्येच्या कड्यावर
तीन महिने उभा राहिलो
नंतर एक गूढ झोप घेऊन
उठलो, स्वच्छ होऊन.

काय हवंय मला
वस्तूंपासून, माणसांपासून
माझ्यापासून ?

सगळी माणसं ज्या कड्यावर
कधी ना कधी येऊन उभी राहतात
ते तर माझं जन्मस्थान होतं.

मरणं किती सोपं आहे !
त्याचा अनुभवसुद्धा येत नाही.
स्वतःतच गुरफटून गुरफटून
मरणं किती सोपं आहे !

पण आता मी
उलगडूनच सैल झालोय्.
आणखी काय हवंय आता ?
पुनरावृत्ती ?

काल मध्यरात्री
जो वाघ माझ्या शरीराला
प्रदक्षिणा घालून गेला
तो शेवटचाच.

टाक मोडलाय.
मी कागदाकडे पाहून
स्मित करतोय्.
□

## ३९. घनकल्लोळ

शांतपणावर
टचकन पडतो एखादा
शब्द
आणि ज्या जागी
पडू नये तिथून
उठतं स्फुरण
जातं कल्लोळत
जसा कातडीखालून
एक शहारा :
डोळ्यात चांदण्याची पाणथळ
एका प्राचीन काळाच्या पठारावर समोर
मेलेल्या योद्धयाचं स्वतंत्र झालेलं घोडं
धूळ पुन्हा पडते धुळीतल्या रक्तावर.

मी पुन्हा शहारून शहरात येतो
हे अंग झालंय कडक बूट
पावसाळाभर भिजून
ऑक्टोबरात पुन्हा वातड झालेलं.
काही जन्मलेत
काही मेलेत

मला मोजताही येत नाही
भूक आणि उकाडा
खोलवरच्या
शांततेवर
टचकन् उमटतो एक घनकल्लोळ
□

## ४०. ख्याल

१

दिवेलागण सर्वत्र झाली. दिवा लावला नाही मीच
अजून. बसलोय अंधारात. वाटत नाही जावसं
बाहेर कुठेही. वाटत नाही पुस्तक उघडून बसावसं
ओळखीची वाटतात कागदावरली अक्षरं तीच तीच.

तावदानं झालीत मळूल मळभ दाटल्यासारखी
दिवस वाटतोय रिकामा. ओशाळतोय प्रकाश
हळूहळू. तुटलेत किरणांचे पाश
झालीय् स्वतःची सावलीही पारखी.

केवळ एका स्विचवर अवलंबून तारणारा दिवा
पण जाणूनबुजून बसलोय तसाच खुर्चीत उगा
नाही कोणतीही आठवण देत अशा क्षणी दगा
जेव्हा काळोखात कळत नाही ही भिंत... की हवा
तेराव्या ओळीतच अडतं ओळखीचं सुनीत आज.

२

मी उघडतो सर्व खिडक्या बसल्याबसल्याच
केवळ इच्छेने उभा करतो दीपकाचा साज
दृश्यांना जन्म देते मस्तकांतील गुप्त खाच

उघडे होतात सर्व ऋतूंचे दरवाजे आज
एकाच अंतर्यामीच्या आपल्याशा अवकाशात
समुद्र होते स्मरणातली संपृक्त गाज.

ह्या विशिष्ट प्रकाशांत, ह्या षड्ज-पंचमांत
सुरांत मिळवलेल्या झगमगटात लोलक
दुःखाचा अतिशुभ्र झोत वावरतो झुंबरात
शिशिराच्या आणि अवंढा न गिळलेला
होतो केवळ स्वेच्छया वाढलेला अवकाश
गळ्यात अडून स्वर मनी लावलेला

एक आतड्यात जळल्या नाजूक उदबत्तीचे वलय

३

आणि अचानक समोर सर्वत्र प्रलय
काळोखतेजाचा माझ्या कातडीवर वर्षाव
फुलते अंगांगावर शहाऱ्यांची राई, जशी लय
करते मस्तकात अविरत विजेचा स्राव
□

## ४१. टॅक्सी राईड

हिप्नॉटिक हिरवे-निळे डोळे
डांबरावर झराझरा लखलख
डोळ्यांवर सतत एक गार खारा झोत
चंद्र-ढगांचा ससेमिरा.
प्रश्न एकच : तू, तू.
तुम्ही सगळेच.
कळून येताना कष्ट झाले पंचवीस वर्षे
आपण माणसंच
आणि तळहातातून सरकणारे सगळे तळहात
नाशवंत...

हाडं थकलीत
मी जातोय भरधाव टॅक्सीतून
एक एस्केपिस्ट, वाऱ्यावर केस उडत असलेला.
□

## ४२. काळी चित्तीण वावरते भासांच्या रात्रीत

भासांच्या रात्रीत
कायम उभं इच्छांचं अमानुष कालातीत लावण्य
भव्यता सळसळती हिंस्र स्तब्धतेत
अपरंपार चांदणं आत्मभुलीचं अरण्य
इथे वावर तुझा काळ्या चित्तिणी
इथे वावर तुझ्या पाशवी वासाचा न् ठिणग्यांचा

इथे संपूर्णाची अनारंभ वादळी मुसळधार
इथे अस्तित्वाची ठाय कोरड उन्हाळी जमीनभर
इथे हिवाळा निष्पर्ण परमेश्वरी कृपेचा
आणि आसक्ती-अनासक्तीच्या वृत्तांत
हजारो मैल माझं-तुझं शरीर स्वैर भटकणारं ...

माझा एकूण एक स्नायू तरारलेला
भासांच्या रात्रीत
रक्ताची आंधळी वैभवं थारोळणारी
तुझ्या आठवणीत
डोळ्यांत वादळी वर्दळ खगोल आणि ऋतुचक्रांची
आणि अरण्यभर मस्त पिसाट
सोसाट्याचा तुझा पाशवी वास
काळ्या चित्तिणी अंधारातल्या, चांदण्यातल्या,
काळ्या चित्तिणी सळसळीतून झेपावणाऱ्या,
काळ्या चित्तिणी उदाच्या वासात मदलेल्या,
काळ्या चित्तिणी वसंतऋतूच्या पाशवी वासातल्या,
काळ्या चित्तिणी हिवाळ्यातल्या पाचोळ्यावरल्या,
काळ्या चित्तिणी भोवती मॉन्सून गुहेत तू तप्त
काळ्या चित्तिणी आपली अज्ञातातली नागडी झटापट
आणि खाली केवढी उष्ण अंधारलेली माती
नांगरलेली, आपल्या हिंस्र समागमाखाली
सगळं जग दया दाखवणार तटस्थ अरण्य एक.

□

## ४३. जोहान्न सेबॅस्टियन बाख्

मला एक विचित्रच स्वप्न पडलं. मी पाहिली
तुकारामाची विराट पाठ वैकुंठ फिरवताना,
आणि बाख्चे अनवाणी तळपाय.
मला एक विचित्रच स्वप्न पडलं अलंघ्य स्वर्गाचं
त्याचा बुलंद उंचावणारा मनोरा उभारलेला
शतकानुशतकं वाट पाहणाऱ्या
निनावी मनुष्याच्या घोळक्यावर.
मला एक विचित्रच स्वप्न पडलं.
एक मृत्यू एक थडगं एक हिरव्या पानाची तीव्रता
आणि अस्तित्वाचं सफेत सर्वस्व.
मी उभा होतो किर्र्काळ्या कफनाच्या शांततेत
मला कळला होता फक्त सुईचा नेढा
आणि सूक्ष्म तीक्ष्णतेत ओवला जाणार धागा
मी पाहिल्या उध्वस्त भिंती, निखळलेल्या विटा, चुना
मला स्वप्न पडलं
एक बाग, एक काटेरी कुंपण मेंदीचं, एक अजून ऊन भुई
आणि मरणाचा इंद्रनीळ प्रकाश
माझ्या कानांच्या थडग्यातला गाण्याचा फाया
गळ्याखालचं सुरळीत अंतर्याम
आणि उंचावणाऱ्या विराट ऑक्टेव्हज्च्या लाटा
फेसाच्या आणि फुलाच्याही शुभ्रतेपलिकडे

मला स्वप्न पडलं
अस्तित्वाचे स्तंभ सरकणारे अवकाशभर
आणि एक त्रिकाळ विस्तारला माझ्या स्थिरथोट्या हृदयात
पडला
जगद्वजनी व्हायोलीनचा गज
एका गुह्य तंतूवरून
आमरण पाणी ओढत
आणि कानठळ्या बसविणाऱ्या कडकडाटात
विश्व लखलखून गेला एक हास्यध्वनी
आणि त्यातून चालत गेले
जोहान्न सेबॅस्टियन् बाख्चे स्वर्गीय अनवाणी तळपाय
माझ्या ठार, उताण्या, पांढऱ्याफटक, फुगीर कानाच्या छाताडावरून.
मी ऐकली स्वर्गाची छतं फाटून जाताना
मी ऐकले अस्तित्वाचे क्रूस उन्मळून पडताना
मी ऐकला अंतिम कोमल हुकूम शांतपणे उच्चारलेला
बत्तीस वाद्यं वाजली एकवटून मृत्यूचे देवदूत होऊन
आणि शुभ्र पान्हे फुटले अंगाईला
थडग्यांची वासरं होऊन दुडक्या चालीने अडखळली
दुधाच्या दिशेने
आमचे गुडघे मोडले आमच्या रुद्ध कंठात
आणि नरकाचा अभेद्य हुंदका अचानक फुटला.
मी ऐकली स्वर्गाची छाताडं फुटून फाटताना.
नव्हता बाख् नव्हतं कोणीही
गरगरा फिरलं लख्ख झुंबर.
आणि माझा जन्म झुगारला गेला सप्तरंग सांडत
ध्रुवाध्रुवातून.
आता न असह्य, न सह्य कोणती वेदना
ह्या अविरत भव्य भमस्कारात भम्म् भम्म्
प्रचंड शांत चक्रगतीत विरतायत् माझ्या शब्दांचे दाते.

□

४४. मूळ

ओळखीच्या काळोखात
चिखलाखाली कुजबुजतात
जिवंतपणाचे असंख्य कण
मग्नतेचे तंतू
सूक्ष्मतेचे जंतू
कैवल्याचे कीटक
विश्वमुखी वनस्पती
पारलौकिक प्राणी
ओळखीचा काळोख
माझी मूळ शक्ती
लहरींचं माहेर
कायापालटांचा कॉम्प्युटर
अनाद्यंत छंद
□

## ४५. स्वर्गाचे चिन्ह

पाण्याखाली निजलेली टपोर द्राक्षं
प्रकाशाचा सेक्सी बाहुपालटी वेढा
आकाशात लखख गुलाबी डाळिंबं
आणि हवेतल्या हवेत हरपणारे हिरे
हृदयात हिवाळा शरीरात हिंदोळा
झोपेत लखलख जागेपणी झोपाळा
मूर्ती मोकळ्या शिल्पाच्या शापातून
प्राणाच्या पाकळ्यांतून वासंतिक पोकळ्या
रित्या रित्या सुगंधात भरीव आरती
अल्लख निरंजन ओहोटी-भरती

हे अल्हाळ वेल्हाळ अंगचेच पाल्हाळ
अंगच्या जंगलांना अंगचेच वणवे
अंगचीच जनावरं अंगच्याच आरोळ्या
अंगच्या अंधारांना अंगचेच उजाळे
लाख लाल पानांचे सळसळतात उन्हाळे
अंगोपांगीच्या अग्नीत उसळून
हे माझे मुंडके हे माझे हातपाय
जे पेटलेले ओंडके जे धडधडते वृक्ष
हा पिता ही माता ही चिता हा जन्म
ही प्रेयसी हा समागम हे स्वर्गाचे चिन्ह.

□

४६. आता तुला

मी माझ्या दुर्धर रोगी मुखानं केलं तुझ्यावर प्रेम
सतत माझ्या गाण्याच्या कॅन्सर झालेल्या फुफ्फुसांनी
गायलो तुझ्या स्फुरणशील नावाचा ऑक्सिजन
काढले नाहीत कधीच माझ्या भुकेचे डोळे

तुझ्यावरून, नाही सोडलं तुला
माझे पाय नाश पावतानासुद्धा
माझ्या डोळ्यांवरून जगाची भव्यता
अदृश्य होतानासुद्धा, १९६१ साली,
जेव्हा तीन मिनिटं आंधळलो होतो मी
सर्व घड्याळांपार, प्रहरांपार, अपरंपार,
जेव्हा तू जवळजवळ संपूर्णपणे मरण पावलीस
अपत्यसंभवाच्या अंधारात तेव्हा आंधळलो
तीन मिनिटं होतो, तेव्हा हुंगलो होतो
तुझ्या रक्तस्रावांची नाशवंत वैकुंठं
माझ्या गळ्यात घोटल्या मरणांचे चिखल
गुठळ्या गुठळ्या झाले, एकदाच माझ्या मुठी
झाल्या घट्ट विचारशून्य,
तेव्हाही मी तुझ्यावरच केलं प्रेम :
तू संपूर्ण तू दुसरी तू वादळत जमणारी
माझ्या प्राणांच्या क्रोधात,
आणि आता माझ्या नसा तुटताना
पोकळीत रित्या होण्यासाठी,
आणि आता माझे प्रवाह मोडताना
आपले धक्के, आपले विद्युत्कण सांडत,
आणि आता माझा चेहरा मरणोन्मुख होताना
मी धाडतो माझे पसरणारे हात सर्वत्र
तुझ्याभोवती.

□

## ४७. इच्छा

कसली इच्छा होती ती ?
अंधारातली उन्हाची अंगं ?
इंद्रियांच्या विषुववृत्तावर
फोफावणारी अरण्यं
आणि रक्त,
ॲमेझॉनचा प्रवाह,
तळहातांखाली दाबलेले
तळहात, तळहात, तळहात.

आणि हातांच्या तळाला
पेट घेणारी
एक आरंभहीन वात.

एकाच काडीवर पेटलेले
लाख दिवे जातायत तरंगत
गंगेमधून, धुक्यात नाहीसे होते,
माझ्या शरीराच्या
वाहाण्यात.

□

## ४८. मीच नाही

कळत नाही, या पोकळीत आता
कसलाच उठाव नसताना, कोण होता
या शरीरात साजरा करणारा
ते दुर्बोध उत्सव.

मला आता फक्त माझ्या कडा जाणवतायत,
वाटतंय की त्वचेचा पडदा दूर सारला तर
या दृश्यात अन् माझ्यात कसलंही अंतर नाही.
पण जिथे त्वचा दृश्यालाच टेकलेली आहे तिथे
अंतर्मुखपणे गरजणारे हे कोट्यवधी कण कसले आहेत ?
मी स्थिरावता स्थिरावता
सर्वांगावर स्थिरावणारा
हा प्रचंड धुरळा कसला आहे ?

आता मी एकटा नाही
मीच नाही.

□

## ४९. मृत्यू

१

आणि हळूहळू हवा ओशाळताना
झुळुकांचे किनारे नाहीसे होताना
थिजताना वाऱ्यावरली तीव्र कस्तुरी
तळहाताखालची वाळू भिजताना

चांदण्यातल्या चांदण्यात रक्त निजताना
होड्यांचे हंस तलावात हरवताना
अंगातून अंग निघून जाताना
उष्णतेचा एक स्तंभ उभा ठेवून

संगमरवराखाली जेव्हा धमन्या फुटत गेल्या
माध्यान्हांचे गोमेद जेव्हा काळोखात उजळले
जेव्हा रक्तांचे धबधबे कोसळून
अज्ञात दगडांवर फेसाळत पसरले

तेव्हाही सबंध आणि सचैल
न्हालेल्या जाणिवेच्या स्तब्ध पाठीवर
सूर्यासारखा सरकत होता एकच एक
ज्वलंत, ओला, अनोळखी थेंब

जिथे ना पाठ, ना पोट, ना अस्तित्व
जिथे ना पोकळी, ना ठिकऱ्या, फक्त एक

एकजीव काठिण्य, अभेद्य अरण्य
जन्मण्याच्या क्षणाची कोट्यवधी अग्रं

सुन्नतेला फुटलेली. जिथे जिवंतपणाची चाळण
मृत्यूचे खडे खेळवत खाली वस्त्रगाळ
एकाग्र समागमाच्या पिठाखाली झाकते
वाक्यावाक्यामधली काटेरी अक्षरं, नेमकी कुंपण

तिथूनही निराळ्याच जागी मी आलेलो आहे
जिथून मी कधीच हललोही नव्हतो
माझ्याच पुतळ्याला वळसा घालून
स्वतःची सावलीही फेडून मी चालतो

समोर प्रकाश : आणि हातात धरलेली
स्वतःचीच नेगेटिव्ह,
        तऱ्हेतऱ्हेचा अंधार
ललाटापासून निघालेल्या
        लाटालाटांत.

२

जखम उघडते आपल्या डोळ्यांचं डाळिंब
दारुण, लाल. प्रत्येक बोटाचा पेटलेला पलिता
तुझ्या शरीराच्या रात्रीतून वाट काढतो

अवकाशात चवताळलेल तेजाचं मोहोळ
स्थिरावता स्थिरावता पुसट होत जातं
हे प्रचंड बुबुळ जसं विरत चाललय

अनादि खाचेत. आता ही आपली एकाकी झटापट
नात्याशिवाय अन् ओळखीशिवाय

आता कोण पुरुष, कोण स्त्री
वेगळेपणाशिवाय.

आता अष्टभुजांच्या वेलांच्या
एकाच सनातन अक्षरावर
आणि स्वत:शीच गरगरणारं
अनंततेचं मग्न सिलिंडर.

आता आपल्या त्वचांचाच डमरू
आणि हे नादाचं घट्ट वलय.

३

कधी तरी एकदा मी प्रत्येक घटनेचा
कांदा सोलत गेलो थेट केंद्रापर्यंत
आणि त्या पोकळीत थरारून गेलो.

नंतर शोधले शब्द, जमवल्या सावल्यांवर सावल्या
कधी नुसत्या ध्वनींच्या मींडांवरून घरंगळत गेलो
किंवा पकडले रंग, चुसल्या चवी, घेतले वास.

उठवले स्पर्श. इंद्रियांचा खुनी पंजा उमटवला
स्वच्छ आरशावर, चेहऱ्याच्या जागी.
हो, मला हिंमत होती, ताकद होती, भक्ती होती.

चारी बाजूंना चिरेबंद दगडाच्या भिंती असताना
मी जपला माझा आतबाहेरपणा, माझं कठोर आस्तिक्य.
जेव्हा प्रत्येक मरणालाही हिरवीगार पानं फुटत गेली.

ह्या जागी आलोय जिथे माझ्या चिरप्राचीनतेसमक्ष
अंगणात पसरून जाईल माझं भूत-भविष्य.
ह्या जागी आलोय्

ह्या जागी बघतोय पुन्हा पूर्वीच्या सर्व जागा;
सबंध चरित्र एकच आणीबाणीचा प्रसंग:
एकच इतिहास, एकच भविष्य, एकच धुरळा

—आणि आनंद.

४

उन्हाचा मोर
थय् थय् नाचला.
निळ्याला जांभळा
विसरून गेला
पिवळ्याला हिरवा
विसरून गेला
पांढऱ्यात लाल
वितळून गेला.

चकाकलं फक्त नाचाचं तेल
नाचणारांच्या बिया फोल झाल्या.

प्रचंड फाळलेल्या जमिनी
आकाशाखाली.

ढगांची ओली उलाढाल
आणि पाऊस धुवाँधार.

हा माझा मुलूख.
हा माझा मुलुखाचा सलोखा.
I have loved a woman
And I have survived a war,

उन्हाचा मोर
थय् थय् नाचला
अंधार बनला.

५

आणखी एक मरण, स्वतःचंच, आठवतं
आठवतं काटेरी कुंपणात उभा राहून
गवताची काडी चावत सूर्यास्ताकडे टक लावून

जी भोवळ घेतली स्वतःतच, स्वतःभोवती
आणि परतताना जाळून आलो स्वतःचंच मढं
पुन्हा एकदा, त्या नेहमीच्या काठावर.
इथे जिथे आलोय तिथे तो सूर्यास्तही आहे
इथे ती भोवळही आहे हवेतल्या शिल्पासारखी
इथे सगळ्याच वस्तूंना येतोय माझ्या जन्माचा वास.

६

अनाघ्रात – म्हणजे काय ?
अस्पृष्ट – म्हणजे काय ?
अदृष्ट – म्हणजे काय ?
अश्रुत – म्हणजे काय ?
सर्वस्व – म्हणजे काय ?

स्वतःच्याच पुतळ्याला वळसा घालून आता
स्वतःची सावलीही मी फेडून टाकतो.
हे बघ, ही न लिहिलेली
कवितासुद्धा
शब्दन् शब्द फाडून टाकतो.
□

## ५०. आठ

अष्टभुज अंधारात दोघांची चौघे
चौकोनांचे अष्टकोन, आठांचे वलय,
नाचाचा प्रलय, पायांचा विलय
आणि एकजीव, एकजीव, एकजीव अंत.

अष्टभुज अंधारात अद्‌भुत अस्ताया,
अंतर्मुख अंतरे. पाण्याचा प्राणाशी
अनुप्रास. अष्टभुज अंधारात स्वतःशीच
शोधाशोध, तुझ्याशी बांधाबांध, ओठांवर बोध.

अष्टलिंगी संभोगात अष्टयोनी झटापट
आणि अष्टमुखी चुंबनात अमोघ ओळख
अष्टभुज काळोखात उगवलेल्या कमळात
मधासारखा वाढणारा गोल गोल काळोख.
□

## ५१. वळसा

वळसा घालताना क्षणभर स्वतःचीच पाहिली पाठ·
ओझरती. स्वतःचीच सावली, पावलोपावली दिसलेली
वळसा घालताना क्षणभर अचानक नाहीशी झाली.
वळसा घालताना तुम्ही सर्वजण क्षणभर विरघळलात
हवेतल्या हवेत. वळसा घालताना सुटला माझा वेढा
स्वतःभोवतालचा. आणि डोळ्यासमोर फुटली पहाट.

आतल्या आत पडला वळसा शब्दाला शांततेचा
वळसा घालताना अचानक सगळे अर्थ विरघळले
आणि क्षणभर एक गच्च अनाकार इच्छा
स्तंभित होऊन गेली अंगातल्या अंगात.
तुझ्या सर्वांगाला वळसा घालताना माझी आजवरची
सर्व शरीरं सावल्यासावल्या होऊन पांगून गेली
एका तप्त शुभ्रतेच्या मुशीत वळसा घालताना
अस्तित्वाची बावनकशी लगड बघताबघता वितळली.
□

## ५२. निद्रानाश

१

ह्या निद्रानाश : मनातल्या मनात
सगळे समुद्र अळणी झालेले, आणि
समोर आडवी तू अंधारांत अंधूक
पांढऱ्या चादरीखाली तुझं सर्वांग
स्तन, मांड्या, नितंब, चेहरा, ओली जिवणी

पाण्याचे प्रचंड वृक्ष उभे आहेत
माझ्या स्वप्नात पृथ्वीवर

तहानेच्या ऋतूत, पान-पान, खाली येतंय
गळून : गळ्यात वाळवंट विस्तारतंय माझ्या
माझ्या डोळ्यांत भिनून झोंबतंय तुझं अस्तित्व.

माझ्या प्रेमाचा विद्रूप, विराट तळहात
मी अंधारात उघडलाय : निद्रानाश,
सर्वनाश. ह्या भावनेचा अमानुष पाश
तेवढा शिल्लक. शिल्लक माझ्या बुबुळांचे
ताठ तळपाय तुझ्यावर खरचटणारे.

मी गाय, तू गवत ह्या भरमसाट माळावर
ह्या भसाड्या दृश्यात माझा मुका हंबरडा
निद्रानाश, सर्वनाश. आपल्या दोघात
वासलेलं हे जन्मांतर आणि दरम्यान
माणसाळवलेला हा अंधूक अंधार.

२

आपण फुगडी खेळलो, खेळलो खूप
फेडली इच्छांची लुगडी ह्या अंधारात
समोरासमोर शतकानुशतकांच्या
अंतरावरून आपण केली उघडी
आपली खडकाळ आस्था एका अतिमानुष
समुद्राच्या फेसाळ फटकाऱ्यांखाली
निद्रानाश, सर्वनाश : ही एकमेकांची वाळू
किनाऱ्यासारखी जगभर अंथरली तीही पांगली
आता फुगडीही विरळ जगड्व्याळ, आणि नजर विरलेली..

३

तळ्यांचे वृक्ष, पाण्याच्या पारंब्या
गळ्याशी मोडलेले नदीचे वळण

[illegible]च्या घाटांवर उभे
[illegible] शब्द,
[illegible] अश्रूंचे भोवरे
[illegible]ळेभोर
रुपेरी हास्यात
पाचूचे वृक्ष, हिऱ्याचे वृक्ष,
कोळशाचे वृक्ष
तुझे वक्ष
ह्या अरण्यात
उघडे
प्रकाशाचे वक्ष, आकाशाचे वक्ष
सगळ्या जगाचा
चिखलल्लेला पदार्थ
घेतो गोलाकार
माझं हृदय
फक्त
कुंभाराचं चाक
माझे तळहात
निद्रानाशाचे, सर्वनाशाचे
हळवे, ओथंबलेले
गच्च, मातलेले
चिखलात हरवलेले
चिखल झालेले
चाकाशी तद्रूप
माझे हात, माझे बाहू
नाहीसे झालेले
वक्ष, वृक्ष, वृक्ष, वक्ष
चाकावर उगवतोय एक दुर्घट घट.
□

५३. आजीचं मरण

माझी आजी मेली. एक बुटकी रोड बाई
एक्क्याऐंशी वर्षांची. आता पलंगावर पडल्याय्.

तिच्या डोक्याभोवती माशा घोंगावताथत.
भयंकरच माणसासारखी दिसतेय
सुतकी लोकांच्या गर्दीत
भावना पसरवतात
अविश्वसनीय–अफवांसारख्या.
मी तिच्या चेहऱ्याकडे बघतो. तिचं तोंड जरासंच
वासलेलं आहे, तिचे पडके दात दाखवतेय ती.
तिचे डोळे उघडायला आले होते, मला दिसतंय
बाहेर, वाऱ्यावर, उन्हातून
एक चिमणी उडून जाते. विसराळू.
एक म्हातारी आणि निश्चल बाई बघून
मी गुदमरतो अन् मला शह बसतो.
ती प्राचीन आहे अन् निर्माल्यवत् बनतेय.
लवकरच तिला झोपवतील चितेवर.
लवकरच आम्ही लाकडं पेटवू
उन्हाळा आहे. ती भर्कन जळून जाईल.
थराथराने नाहीशी होईल माझी आजी
लाकडाच्या फळकुटावरून जाळात झेपावेल.
ती गुरुत्वाकर्षणाविरुद्ध उंच उंच जाईल सूर मारून.
ती नियमानुसार खोल बुडत जाईल.
आजीनं घर सोडलंय
आता ती सर्व वस्तूंची समकालीन झालीय.
चिमणीसारखी ती विसराळू बनेल
माशा घोंघावत राहातील त्या उशीभोवती
जिथं तिनं डोकं ठेवलं होतं.
माझी आजी. जी मेल्याय् ती.
ही आजीच का ? दात पडलेला सूर्यास्त
न् सुरकुतलेली हवा
आणि मी आता भरगच्च बसलेला जाड आरामखुर्चीवर ?
□

५४.

स्पर्शताच हृदयात उघडलं डाळिंब उंचसखल
टपोरं पाणीदार
उघडउघड मोतिया गुलाबी घड
नखशिखांत निवालेली लखलख

कोण
- निवळ रुपं
मंदावलेले पैलू
खनिज आणि खगोल
परस्पर.
काळसर रक्त वळलं
चर्र स्पर्शावरून
डाळिंबी आंधळली आभाळं
मस्तकात
लाखलाख उणेपुरे पाणीदार दाणे
उठावले
स्पर्श
गमावलेले गच्च
एकदाच बधिरून गेलेले तंतू
बहिरे प्राजक्त
बहारले
आतल्या आत
त्याक्षणी
गुडघ्यातच गूढ झाली घडामोड वाटेची
आवंढे फुटले
गळाभर
पांढरे चाफे
काळोखले
शुभ्रले
शुभशकून पुन्हा पुन्हा
पापणीजवळ.

□

## ५५. वृक्षपात

काडकन् मोडते
अन् ऐकू येते फांदी
काडकन् दिसते
कडकडतो वृक्ष

दचकतात मुळं
कानशिलात नांदी
भ्रष्ट, भ्रमिष्ट
जमिनीवर कोसळलेल्या
उध्वस्त उन्हाळ्यात
भ्रष्ट, भ्रमिष्ट
शहारलेल्या मुळात
काडकन् मोडलेली
शुभ्र जागा शांततेत
स्पष्ट अनिष्ट
पानांचा गदारोळ
जड हवेवर
हिरव्या हिरव्या कोसळतो
उभ्या उभ्या खाली येतो
शांत होतो वृक्ष
निरिच्छ
न सळसळणारा
लाकडी आणखी हिरवा खच
गर्द होऊन येतो
विरळ होऊन जातो :
बघता बघता खच्ची
लाल आभाळतात इंद्रियं.
बघता बघता खच
रक्ताळतो खाचांवर.

□

२२५९१
२३८५

## ५६. येवो रात्र पुन्हा

येवो रात्र पुन्हा आणि शनी आणि पुष्कराज अन् दिवे
झुलो प्रचंड कलंडलेली कमान संध्याकाळ ते पहाट
उघडोत पुन्हा हृदयामधली शुद्ध माध्यान्हीची उन्हं
पाहो पापणी उलटून डोळ्याचंच पृष्ठ, स्वतःचं ललाट

आता हे शहर माझ्या स्वप्नात झालंय चंद्रोन्मुख
त्यांतल्या फॅक्टऱ्यांसकट, रांडांसकट, रस्त्यांसकट
आता उडालीत माझीच कालपरवाची कस्पटं
वाऱ्यावर, घराघरावर, माणसामाणसाच्या स्वप्नांत

आता हे शहर झालंय अंतिम, झालंय निश्चय
शांतपणे जळतोय इथला एकेक निखारा
काळोखात जणू नाहीशी झालीत वैधव्यं न् संभोग
आणि वाहतोय फक्त रात्र ते रात्र जिवंत वारा.

## ५७. सार्वजनिक बागेतली खाजगी कविता

१

बागेतल्या गुलाबांचे स्फोट ऐकत, एक ऋतूभर,
मुलांचा किलबिलाट चेंडू हवेतच असताना
झेललेला. गवत ऐकलेलं वाढताना रात्री
कुंद हवेत क्वचित. एखादा ढग जावा मनावरून
आणि आभाळ यावं भरून. संदिग्ध झाडांची सळसळ
ओंजळव्जा कानांत; जसे पाण्यावर लिहिलेले रंग
पानांचे, सार्वजनिक बागेतले सार्वजनिक ऋतू
आणि प्रत्येकच फुलाचा खाजगी शिशिर, अन् वसंत

२

पातळ पिवळ्या तरल मेणबत्त्यांच्या ज्योती
पाण्यासारख्या काळोखात जशा फुलतात
थरारत, थरारत. तशी फुलं. तशा पापण्या
जळल्या ज्योतींच्या, लांब निळसर डोळा झाकतात
मेणाला फुटलेला. मेणाचे अश्रू ओघळतात

कढून डोळ्यापाशी. पुन्हा पायाशी निजतात
बेढब थिजून. संपत आलेत डोळे. तशी फुले
परमेश्वरी खुरपे खणते खालच्या मातीत
पानगळीच्या मोसमातच पुढल्या ऋतूचे आवर्तन

३

भिरंगत येतात पिकलेली पानं पुन्हा मातीवर
वनस्पतींना नसतात अन्य अश्रू; प्राणिज
अश्रूंसारखे ऋतूंपलिकडचे; त्यांना नसतात डोळेच
रडायला. कुत्रा आणि गुलाब यातला सूक्ष्म फरक
एवढाच — बागेतल्या माणसाला कळतो.
वर्तमानपत्राचे कागद पसरून आकाशाखाली
तो सुशिक्षित कबुतरासारखा बसलेला असतो
आपल्या चष्म्यापलिकडचे हिरवे निळे जग पहात.

४

विचार करतो अधिकाधिक कुशल माळ्यांचा
परमेश्वर वगळून. कल्पक बागवानांची
कात्री कातरते मेंदीमध्ये हरीण. व हरिणांचे
कातडे वापरते ध्यानस्थ बसायला. बागवान
कुशल असल्यास वापरतो ऋतूंचेच खुरपे
मनात येईल ते कोरायला. झाडांना प्रत्यक्ष
स्पर्शही न करत. वर्तमानपत्रावर बसून.
त्याच्या ढुंगणाखाली निमूट, जाड टाइपात
असतात अणुबॉम्ब फुटत. तो गुलाब ऐकत असताना

५

सार्वजनिक बागेचे असतात अनेक उपयोग
जसे प्राचीन काळी सार्वजनिक अरण्याचे असत
बागेत तप करावे, फुगड्या खेळाव्या, जेवण जेवावे,

किंवा प्रेम करावे. बाग असते पार्श्वभूमी
पुष्कळशी सोयिस्कर अशा कितीक व्यवहारांना.
बागेत वाचावा कालिदास, किंवा एरोडायनामिक्स,
कोणत्याही ऋतूत. त्याला फुलांची ना नसते.
पण बाग म्हणून बागेचा विचार करणं कठीण जातं
प्रेमगीतातसुद्धा; भलत्याच झाडावर फुलतात
भलभलत्या भावना. बाग असते सार्वजनिक कविता

६

एका विशाल, अदृश्य, खाजगी खुरप्याची.
खणलेल्या मातीवर असतात त्या खुरप्याच्या खुणा.
मुळं ओळखतात त्या खुरप्याला अचूक.
बागेपूर्वीची जागा असते सतत बागेखालीच
बियांची मुळं झाल्यावरही, अचूक रसायनासारखी

७

भिरंगत येतात पिकलेली वर्तमानपत्रं, जमिनीवर
जाड टाईपात वहरतो जाणिवेचा विस्तार
कागदी अन् मानवी ऋतूत. चष्मा जपतो डोळे
विश्वापासून— बागेपासूनही. चष्म्याआडचे अश्रू
मेणासारखे गरम असतात. दिवसेंदिवस माणसाचे
पाय बेढब होतात जसे डोळे जळत येतात
दर्शनाच्याच मुळावर, काळोख गडद करीत.
विविध रंगांनी मूकपणे जळणाऱ्या बागेवर
डोळे उजळले जातात— गुलाबाच्या काडीवर
प्राण पेट घेतात. संथ आणि ज्वलंत रात्री
जेव्हा निष्पाप विदूषकासारखी उभी असतात
झाडे बागेतली. येतात गवतावर वर्तमानपत्रवाले
अन् खाडकन् येतात वठणीवर गुलाब कवितेतले.
☐

## ५८. पिसाटीचा बुरूज

समोर सूर्यास्ताचं खिंडार
हवा दारूगोळ्यासारखी तीव्र
हे संध्याकाळचं लोखंड
हा इतिहासबाह्य साखळदंड

हे डोंगर, ह्या दऱ्या, ही पठारं, ह्या खिंडी,
हे कडे, ह्या कपारी, हा निरुपयोगी बुरूज
आणि ही ढासळून गेलेली तटबंदी,
सगळं उघडं पडलंय्
न वाली, न कैवारी कोणी
अशी एक आणीबाणी
ह्या बिनवस्तीच्या बुरुजावर
फक्त दगडी बाकावर बसलेला मी
आणि सभोवार काळेभोर वारे
पश्चिमेला पिंजारलेला विस्तव
आणि आकाशभर
भराभरा पसरणारी राख
इतिहासबाह्य बुरुजावर
माझं चारित्रबाह्य मीपण घेऊन
स्तब्ध, एकटक, दगडी समाधीत
मी : ह्या बाकावर बसलेला मुक्त कैदी.
हे पहाड, हे फत्तर, हे डोंगर, हे कातळ,
ही पठारं भरडली जातायत माझ्या जठरात
पोटात जन्मभर जे ॲसिड पोसलं
त्यात आख्खा सह्याद्री विरघळून जातोय
माझ्या वृषणात वितळतील हे पर्वत
माझ्या रेताला येईल ह्या पाषाणांचा वास
माझ्या रक्तातून वाहातील हे कडे, ह्या कपारी
माझ्या मस्तकात फिरतील
हे पिसाटीच्या बुरुजावरले
काळेभोर वारे.
काळोखं बीज ताड्कन् फुटून लख्ख झालेली

माध्यान्हाची पांढरीशुभ्र लाही
मी अनुभवलीय्.
मी अनुभवलीय
वेदनेची टच्च-टपोरी कळी
अचानक फुलाचा उच्छाद मांडणारी
उघड्या पाकळ्यांनी.
मी भोगलाय
भुईत तीव्र तसू-तसू रोवणाऱ्या मुळाचा
सक्त आवेग.
आणि आता ह्या अपंग क्षणी
सर्वचक्र थांबलं असताना
फत्तरकपारीतले खडबडीत अर्थ
शोधणारी माझी बोटं चूप
कडेलोटांकडे एकटक पाहाणाऱ्या
माझ्या अविचल पापण्या चूप
विराट रात्रीच्या धवधब्यात
माझ्या ओठांवरची भाषा चूप.

पिसाटीच्या बुरुजावर
चिरेबंद दगडातून उगवलेल्या सुक्या गवतांतून
वारा जात असताना
मी भोगतोय ह्या हवेतली उग्र क्षुब्धता
वर, क्षणार्धात दिसणारी प्रकाशवर्षांची अंतरं
खाली, स्वतःच्या अस्तित्वाचा निश्चल कमंडलू
वर, नक्षत्रांची उफराटी गोपुरं
खाली, माझा स्वतःचा वाढता काळोख
समोर : सूर्य बुडाल्यानंतरचा
लालसर काळोख
मागे : माळ, टेकड्या, रान, झाडं, खाचखळगे, गवत.
पिसाटीच्या बुरुजावर

फक्त वाऱ्याची गजबज
आणि चरित्राच्या पोकळीत
दगडी बाकावर, दगडी समाधीत
मी.

पिसाटीच्या बुरुजावर
माझ्या नरड्यावर आहेत
फक्त वाऱ्याचीच काळीभोर बोटं
फक्त रात्रीचंच अचूक नख.
आता अनुभवतोय मी
काठिण्याभोवतालची अनारंभ पोकळी
ही सार्वभौम आणि अपंग अलिप्तता
न पशूची, न परमेश्वराची
ही मर्त्यपणाची जलद उडणारी नाडी
आणि ही काळोखाची अफाट उघाडी.

पिसाटीच्या बुरुजावर
दगडी बाकावर
माझी जिवंत पिंडी
आणि वर
प्रचंड शंखाकार गोपुरावर
दिक्कालात जडवलेली नक्षत्रं
गिरवली जाणारी, पुसली जाणारी
बिनभाषी अक्षरं.
सुन्नतेच्या देवळांत
सुन्नतेचाच घंटानाद ऐकत
मी स्थिरावलोय
ह्या स्थूल अनंतकाळात
स्वतःच्याच किर्र काळजातली जिवंत धडधड ऐकत.

□

५९. के. मा. जोशी, पारद्रष्टे, निपुत्रिक वारलेले. यांच्या मर्तिकाचे मुक्त भजन

१

केशवराव तुमचं हार्ट
फेल झालं
दोन भिंतींवर समोरासमोर
दोन घड्याळं
मधोमध नेमकं तुमचं कपाळ थिजलं.

बायको अगोदरच गेलेली
तिचा हार घातलेला
फोटो भिंतीवर होता.
आजानुबाहू आणि उघडेबंब
तुमचे तीर्थरूप
त्यांच्या फोटोतून तुमच्याकडे बघत होते.
राणा प्रताप आणि साईबाबा
उडणारा हनुमान
तुमच्याकडे बघत होते.

शेजारीपाजारी
तुमच्या प्रेताकडे बघत होते.
अशा वेळी
तुम्हाला कोणाचं भविष्य
चित्रपटासारखं दिसलं ?
तुमचं क्षितिजसमांतर शरीर
कोणत्या काळावर पहुडलं ?
आता ह्या फर्निचरचं काय होईल ?
काय होईल ह्या आरशाचं ?
काय होईल ह्या फोटोंचं ?
कोण घालेल तुमच्या कैलासवासी
पत्नीच्या फोटोला हार ?
कोण लावील
तुमच्या चरित्राचं उघडं दार ?
तुमची नाडी बंद पडलेली
आणि दोन्ही घड्याळं चालू
भर उन्हातून जाताय तुम्ही
थांबा, एक हार घालू
घालू हार, उधळू गुलाल
झांजांपलिकडे झोपलेलं तुमचं पितळी कपाळ
दुतर्फा लंबक चालू झालेले...

२

" I am a closed man "
असं तुम्ही म्हणायचात.
तुम्ही आता उघाडीला आलात.
तुमच्या भाषेचा धबधबा
आताच विरळ होत चाललाय
तुमचं तोंड खोटं पडलंय
तुमचे डोळे खोटे पडलेत

तुमचं सर्वांग उठलंय ह्या साक्षातातून
तुमच्या नाकपुड्यांत बोळे आहेत
तुमच्या स्मरणशक्तीत कापूस पिकलाय
विस्मरणाचं काळंभोर पीक
भरून आलंय् तुमच्या चेहऱ्यावर
उजाड रहस्यं फाकलीत तुमच्या
कातडी बांधणीभोवती
" Forgetfulness is what I cultivate "
तुम्ही म्हणायचात
तुम्ही काय विसरलात
आणि काय आठवलंत
कोण जाणे
तुमची त्रिकालदर्शक जीभ
आता टाळ्याला लागलीय
तुमचे हात थंडगार झालेत.
मी तुम्हाला वीस रुपये देऊ लागतो, केशवराव
एकदा तुम्ही मागितलेले
मी तुम्हाला एक भरपूर जेवण देऊ लागतो, केशवराव
मी तुम्हाला एक मारामारीचं
इंग्लिश पिक्चर देऊ लागतो...
तुमच्या निपुत्रिक
मरणाचा आवंढा
गळ्याखाली लोटल्यावर
मी तुम्हाला ईश्वरकृपेने एक देऊ लागतो
केशवराव
तुमच्या चरित्राचं दार हलकेच बंद करून
मी त्यावर कडीकोयंडा
लावू लागतो
एक कुलुपाएवढा सामसूम शब्द मी तुम्हाला देऊ लागतो.
□

## ६०. शेक्सपियर, १९६४

असं काही नसतंच. असेल. फक्त एवढंचसुद्धा असेल.
किंबहुना नसतंच असं नाहीही. काहीही शकेल
कोणीही. जर धजेल. मी काय धजू सकाळी,
भरदुपारी किंवा अन्हमध्यी आणि संध्याकाळी,
दुस्साध्य रात्री ? मी धजेन तर होईलही काहीही.
मी का विचारेन. मी विचारेन का ? कशास्तव
कशास्तव विस्तव. का वास्तव ? ते म्हणतात.
ते म्हणतात खाडाखोड आणि खड्डे करून
अखेर तरीपण काहीही साधतं, निदान निष्काम
कर्म. कर्मणि प्रयोग कर्तृत्वाचा. ह्याच अधिकार.
मी कधी कधी म्हणत नाही कशालासुद्धा काय.
ते म्हणतात मर्त्य आहेस. उखडला जाशील
भलत्याच कायमचा क्षणी. आणि मेल्यावर काय.
म्हणून सगळेच टरकतात. असून नसून सगळे.
मी कधी कधी जवळजवळ कबूल करतो समोरचा
कबुलीगुलाब काट्यांसकट खच्च पाकळ्यांनी.
एक भव्य गुलाबी निद्रानाश पहाटेएवढ्या
पाकळ्यापाकळ्यांचा. मी स्वीकारतो भिंत.
मशिनं मनुष्य आणि पशुपक्षी. चैतन्यासक्ती.
जन्मबळजब्बर. मी म्हणतो असेल, धजेल, शकेल,
कोणीही हा कोणाचाही कधीपासूनचा कायमचा
अंतर्बाह्य मुक्तपंजर. असं काही नसतंच. असेलही.
नसूं शकेल. असूं धजेल. दे उत्तर. घे प्रश्न.

## ६१. पालट

१

त्यांनी हलवलीत इथून
सगळी झाडांची चिन्हं
या ॲव्हेन्यूमधून.
रस्ता जातोय्
भयंकर सरळ.
एकही हिरवा
स्फोट नाही दिसत
मातीच्या उजाड विस्तारात.
हा आहे ओसाड
आध्यात्मिक ॲव्हेन्यू

स्थळ
मरणाचं
आणखी एका सुरवातीचं.

ही सुरवातही कशी
किर्र आणि कष्टसाध्य
होतकरू अन् निष्पर्ण.
मी पाहूसुद्धा जातो
शुद्ध आराखडा
विनातपशीलाचा
आणि वळवतो भावना
निव्वळ अंतरात.
ह्या खेपेस माझ्या डोक्यावर हॅट नाही
कोट अंगाबाहेर गेलाय
नुसता शर्ट घालून मी काम करतोय
एका निर्मनुष्य ठिकाणी

२

मी घेतो संभोग.
तू घेतेस संभोग.
सक्त पांढऱ्या झालेल्या
बिछान्यावर.
आपण घेतो संभोग
एका पोकळीत.
आपल्या हाडात
एक चिडीचूप शांतता.
अशाने रक्त
वाहतं जास्त मोकळं,
आणि आपण घेत नाही
त्याचं ज्वरमाप.

अंग जन्मतं तपकठोर
आणि त्याचा एकुलता विपर्यास
असतो आत्मा.

तू रत होतेस
मी रत होतो.
आपण दोघेही होतो रत.
एका प्रकाशात जो
नाही दयाळू
नाही तपकठोर.
आपण प्रणय करतो
जेमतेम हालचाल करत
एका अवघड आणि म्यानाबाहेरच्या
जाणिवेत.

३

असू दे हा प्रकाश
चव नसलेला
कोवळ्या वयाच्या मातेच्या
दुधासारखा.
असू दे ही खोली
कृश
वय उलटलेल्या
प्रियकराच्या स्पर्शासारखी
असो ही हवा
उजळ आणि शेलकी
एकाकी दोघांच्या
अत्यंत एकाकी मिठीसारखी
देऊ देत ह्या इंद्रियांना तोंड
बाह्य वस्तूंच्या

मखख वस्तुनिष्ठेला
आणि दूरपणाला
आपण आपल्या
विलंवित समागमात
हरपून जाईस्तोवर
एकमेकांच्या अस्तित्वावर
सावरलेला
तोल जाऊन.

४

एकमेकांना स्पर्श न करता
आपण एकेकटेच राहतो
मला काय ठाऊक
तुला काय वाटतं
अनवाणी चालताना
थंडगार फरशीवरून
माझ्या मिठीबाहेर
पण आकाशात तरी
चांदण्या आहेतच ना ?
मला माहीत नाही.
मुख्य म्हणजे कळून घ्यायची आता इच्छा नाही.
त्यांचा काहीच संबंध नाही
ह्या सगळ्याचा एकूण काय अर्थ व्हायचा तो होवो.
खरं तर ह्या सगळ्याला कधीच महत्त्व नव्हतं.
केवळ भीतीपोटी आपण बांधलं
प्रतीकांचं आणि खाणाखुणांचं एक छत
जे आता मी
हलवतोय
आपल्यावरून.

□

६२. पुन्हा मी गाडला जातोय

उन्हातून, क्लोरोफॉर्ममधून
माझी खुर्ची गडगडत चाललीय
अंगातल्या अंगात बंद बल्बमध्ये
तापून पांढऱ्या अन् आंधळ्या झाल्यात
माझ्या बेभान फिलामेंट्स

चकचकीत फरशीवरून

सरकतात ही लोखंडी चाकंही बेभान
कोणाचं तरी रक्त जवळपास ठिबकतंय
कोणाचं तरी रक्त सर्वत्र ठिबकतंय
माझा गळा सुजलाय
मला फक्त ऐकूच येतंय

केवढं सोपं, केवढं प्रचंड
हे अनाहत मरण
मला उद्या डिश्चार्ज मिळतोय
माझी फुफ्फुसं स्वच्छ आहेत
केवढं सोपं, केवढं प्रचंड
अनाहत जीवन ...

मी पुन्हा शुद्धीवर येतोय
हा गोंगाट
हा तर माझ्या सध्याच्या
पोकळ जगण्याचा
भोंदू घरघराट ...

उन्हात, क्लोरोफॉर्ममध्ये
लांबट पांढऱ्या धुरकट दर्पात
जे मढवलंय ते
माझं प्राचीन जगणं होतं
माझं उपटलेलं मूळ होतं

पुन्हा मी गाडला जातोय
वरकरणीच्या जगण्यात
एका काल्पनिक
मरणानंतर.

६३. कोजागिरी, १९६७

१

सामोरी, पाठमोरी, उभी आडवी
पौर्णिमा

रात्र : रक्ताच्या थेंबाथेंबात हजारो
झुंबरं.
एक काळंभोर सळसळतं वस्त्र
माझे डोळे फेडणारं
आणि तुझ्या सलग
हालचालीची
संथ, उद्दाम भरती.
तुला दहा बोटांची आरती
तुझे स्तन पौर्णिमा, तुझे नितंब पौर्णिमा
तुझ्या अस्तित्वाची
संपूर्ण अमावास्या
एका क्षणात उजळ,
उफराटलेली.
प्रणयाचं अमानुष सजीव गवत
माझ्या अंगांगावर
उगवून येतंय
माझ्या हृदयाचा धबधबा
कोसळतोय अविरत
समोरच्या अनादि रिक्ततेत
माझ्या कानात शुक्राची चांदणी
चमचमतेय
पावसात मातीने ओठ उघडावे
तसे मी माझे प्राण उघडलेत आज.
आता झर्कन् आत वळून
नाहीशी हो माझ्या मनात
आणि शंभर वर्षांनी
जगभर उगवून ये
ह्या शब्दांच्या कल्लोळत्या प्रतिबिंबांमधून.

२

प्रत्येक श्वासापुढे
पूर्णविराम
मी समूळ
नाहीसा
प्रत्येक क्षणात

केली जी पाशवी
आगळीक
मनापासून
शरीरातून
अशरीर उपसून
तीही
नाहीशी.

तू आहेस, नाहीस
तू होतीस, नव्हतीस
आणि
नसशीलच . .

तरी आहे–नाहीचा
किनाराच उघडा पडलाय
तुझा दरारा
भिजल्या वाळूवर पसरलाय.

मी वाट पाहीन
थेंब वाढून त्यांचे समुद्र होईपर्यंत
जरी
प्रत्येक श्वासापुढे
पूर्णविराम...

३

झेल
        ही लाटांची झालर
पापण्यांवर
        चंद्रासारखी तू:
टाक कटाक्ष
        स्थिर, आकाशस्थ
डोळ्यांनी
        माझ्या उसळणाऱ्या
पार्थिव इच्छेवर.

हा ग्रहच थंडावतोय
धूसर होतायत माझे डोळे
माझ्या हातांचे पंजेही अंधूक झालेत
माझ्या मांड्या
अंधारात विरघळतायत

आता इथे फक्त
स्पष्ट दिसतंय
माझं अनामिक
आणि उत्स्फूर्त
काळंभोर
लिंग

तुझ्या अफाट पौर्णिमेत
उभारलेलं.

☐

## ६४. सॉनेटस टु माय ग्रँडमदर

१

सत्तर वर्षे शरीरातल्या श्रद्धेला सुरकुत्या पडल्या; समुद्रासारख्या.
चुलीच्या प्रकाशांत भाजले तळहातांचे खरवरीत पापड.
जीर्ण झाले बुबुळांमधले पाणी; आणि बुटक्या, रोड अंगातली
गती दैनंदिन वाळवंटात गंगावतार घेणारी.

आंधळ्या, मुक्या, बहिऱ्या श्रद्धेहून अगतिक हालचालीत
माझे शब्द मागोवा घेतात चाचपडत चिखल्या झालेल्या पावलांचा.
तुझिये निढळी कोटिचंद्रप्रकाशे..
फुटक्या कपाळावरचा आयुष्यघाम
पाट्यावरवंट्यावर रगडले जाते तुझे चरित्र
आणि माझ्या हृदयाच्या निर्मल भिंतीवर कलात्मक
चढतो तुझ्या धुमसल्या श्रमाचा काळाकुट्ट धूर
तू न कधी कांगावा केलास सुरकुतलेल्या हातांनी
हृदयाचा पिळा पिळताना, सत्तर वर्षांत न ठेवलास एक थेंब
जो देईल माझ्या शब्दांना तारे तोडण्याचे बळ.

२

लहानपण... दूरच्या देवळात काकडआरती. वर चांदण्या
भुऱ्या अंधरात मी चाललोय प्राजक्ताची फुले वेचायला
जगाची वही अजून खचून भरलेली कोऱ्या पानांनी
न पहाट अजूंन गिचमीड झालेली. मुक्त दिवसांचा बहर.
हुंदाडलो ढगाखाली एकटाच. लोळलो ओल्या गवतात.
शाळा चुकवून विराट दुपारी एकटाच बसलो कोठारांत.
तेव्हा तू जाच केला नाहीस म्हणून तुला संपूर्ण विसरलो
आणि नंतर झोकांड्या खात गेलो स्वतःच्या तारुण्यात
तेव्हा तुझ्या म्हातारपणाने झाकून ठेवले माझे रात्रीचे ताट.
पडद्याआड तुझी सावली वावरत होती हे अंधूक दिसे
किंवा जाणवे. पण मी फेसाळलो माझ्याच वादळात
आज तू कोरडा ठेवलेला उदंड समुद्र पाहतो
सत्तर वर्षांचे हृदय पिळून कोरडे केलेस जे तू
माझ्या हृदयात ते करील आजन्म गंगावतरण.

□

## ६५. ध्रुवपद

मरण पाणलोटासारखं पडतं
काळाभोर प्रवाह झळाळीत झोकून
पण क्वचित्, आता जसं छातीच्या
दुखऱ्या ठेक्यातून ऐकायला येतंय त्याचंच
अविच्छिन्न लयीतलं भजन, मरण उठाव घेतं
ओळखीच्याच चिखलातून अफलातून
आणि सर्वांगदेखणा विठ्ठल उपजावा तसं.

उपाशीपोटी सूर्योदयाच्या तेजस्वी ब्लेडसनी
चिरली जाणारी माणसं, किंवा भरदुपारी
ज्यांचे कोथळे बाहेर पडतात रस्त्यावर,
किंवा यादवी युद्धात, किंवा नफ्याच्या
भट्टीत भाजून होरपळून, लक्षावधींना
येतं मरण ते वेगळं, काव्यबाह्य
आणि कलाबाह्य मरण : वेगळंच आणखी
ह्या स्वत्वाला कुरतडणाऱ्या खोलवरल्या
कॅन्सरच्या मरणाहून ...

मी एकदम मरणार नसेन तरी पण पहा
कसा क्षणाक्षणाने विरळ होतोय हा अनुभव,
कसा एकेक पांग फक्त फिटतोय अधांतरी,
कसा एकेक स्पर्शाच्या कणसावरून अल्लद
फिरतोय बेभान कोयता, कशी ही पिकं

मुकी, दाणेदार, ढिगाढिगांनी, राशीराशींनी
जातायत स्तब्ध अर्थांच्या कोठारांत—
तर हे माझं स्वतःचं जन्मदत्त, वतनी मरण.
हे माझ्या अरण्यांचे कोळसे—हा माझ्या
कोळशांचा विस्तव—ही माझ्या विस्तवाची राख.

आणि आता बोटांच्या अग्रांवर बोलतील बुलबुल
आणि आता केसांच्या झुलपांत उगवेल आंबेमोहोर
आणि आता डोळ्यांच्या पृष्ठावर येतील देखावे
मस्तकींच्या सर्व बीजांच्या लाह्या झाल्यावर.

ह्या मरणातून पुन्हा अस्तित्वाच्या शुद्ध ज्वाला
बाहेर पडतील, पालवी बनतील, पाणी होतील,
पुन्हा शरीर धारण करील वासंतिक उन्मेष
पुन्हा रस स्रवतील, पुन्हा पशू हुंदाडतील,
पुन्हा वेदनांच्या रानोवनी सुखे फुलोरतील.

पण नुसत्या ह्या रोमँटिक भुलावणींतही
उरतात कडक झालेले बूट, घामेजलेले
कपडे, बल्बमधलं खिळखिळं फिलामेंट,
रक्तप्रवाहांतून धावणारी सूक्ष्म गुठळी,
वाक्यावाक्यात वाढणारं बेदम अंतर,
फुप्फुसांचा प्रयास, रेटलेला श्वास,
अन् कदाचित् जहाजाने उचललेला नांगर.

किंवा आता या एकाकी कवित्वाच्या
पिंजऱ्याची सताड दारं उघडली जरी
तरी धजणार नाही कोणी या तपस्वी अवकाशात
पुन्हा नव्याने श्वास घ्यायला. हे कठोर थडगं,
ही चिरेबंद समाधी, हा कर्कश तुरुंग,

हा अबोध चिरंतन वसंतऋतू, ही
अनारंभ भरतीची समेची मात्रा,
हे निर्विकल्प भजन, हे पंचेंद्रियांचं म्यूझियम,
ही तर्काची वेधशाळा, हे भावनांचं यज्ञकुंड,
हा पापपुण्याच्या पाचूंचा लखलखणारा पॅलेस,
ही कोबाल्ट ब्लू आच्छादनातून सुरीसारखी
गेलेली सराईत व्हर्मीलीयन रंगाची रेघ
ही आता पुरेपूर लौकिक होऊन टाकली.
तर आता हे उरलेले क्षण आणि तास,
कदाचित् आठवडे, महिने, अथवा सुदैवाने वर्षं
भररस्त्यात पडून पाहिजे गाठलं जीवन
किंवा त्याचा सामोरा अभाव.
आता एकेक देवघेव केली पाहिजे रोख
इतिहासाबाहेर पडून. आता उडालं पाहिजे
गॅसच्या फुग्यासारखं, रुसलं पाहिजे
पाण्याच्या पिंपासारखं, हसलं पाहिजे
भेळपुरीतल्या कांद्यासारखं, आता
धावलं पाहिजे बेभान उतारावरून
एकेका सेकंदात सबंध जन्माचं
स्कायस्क्रेपर उभारत, शहरं वसवीत.
आता घंटा वाजवल्या पाहिजेत, आता
रस्तोरस्ती कविता वाचून दाखवल्या पाहिजेत,
आता जास्त जगू शकणारांचे हात होतील भक्कम
असा एक अवलिया मंत्र उच्चारला पाहिजे.

कोणत्याही क्षणी आम्ही जीवनाच्या प्रवाहातून
मरणाच्या कुरळ्या लाटा कधीच वेगळ्या केल्या नाहीत,
करू शकलो नाही, करू इच्छित नव्हतो,
आणि हेही आमच्या मरणाचं वैशिष्ट्यच आहे.
□

## ६६. बहिऱ्या-मुक्यांची दिंडी

सुन्नतेच्या सर्गाच्या पहिल्या श्लोकाची
सुरुवातीची ओळ ओठावर घेऊन
जे जे कवी जन्माला आले

ह्या स्वर्गीय दवाखान्यात
त्यांच्या मुक्या रक्तातून वाहात गेली
फक्त इतिहासाची विरामचिन्हं
त्यांच्या डोळ्यांसमोर पसरली होती
फक्त स्तब्धतेची विराट मैदानं
आणि ऋतू जेव्हा पालटले
तेव्हाही संपूर्ण निमूट
एकसंध निरक्षर राहिलं त्यांचं विश्व

बहिऱ्या-मुक्यांची दिंडी
पंढरपूरला गेली तेव्हाही
न झांजेवर झांज पडली
न यमकांची उघडमीट झाली
न विठ्ठलाचे नाव निघाले
प्रचंड विनाविठ्ठलाच्या वाळवंटी
चंद्रभागेच्याच काठी
बहिऱ्या-मुक्यांनी डाव मांडिला
आणि आपोआप गप्प झाले
ज्ञानदेव-तुकाराम.

बहिऱ्या-मुक्यांच्या भजनात होता
कल्पांताला भेटणारा
अज्ञानाचा आकांत
आणि समूर्त विठ्ठलाहून उदंड
निःशब्द आकार
बहिऱ्या-मुक्यांची रांग
प्रश्नचिन्हांची कंपनं
उद्गारचिन्हांची आंदोलनं
अंगांग गाजवणारी स्पंदनं
कधीच ओलांडून गेली होती

बहिरे-मुके जन्मतःच गेले होते
शब्दांपलीकडे
त्यांच्या मुखस्तंभ सुखदुःखांना
कोणाचाच स्पर्श होणार नव्हता
विठ्ठलाकडे मागितले त्यांनी
मुख आणि कान
पण युगे अठ्ठावीस
जो फक्त विटेवरी उभा
तो राहिला तसाच
निश्चल आणि निरुत्तर.

बहिरे-मुके जेव्हा परतले
पंढरपुराहून
तेव्हा त्यांच्या डोळ्यांसमोर
पुन्हा तशीच पसरली होती
विराट स्तब्धतेची मैदानं
मात्र त्यांच्या निःशब्द विश्वातून
ठिकऱ्या ठिकऱ्या उडत होत्या
अक्षरांच्या.

हे बहिऱ्या-मुक्यांच्या परमेश्वरा
मला बहिरे-मुकेच वाचक दे
मला बहिऱ्या-मुक्यांचा
बहिरा-मुका महाकवी बनव
मला छंदलयींची प्रलोभनं
दाखवू नकोस
माझे सर्व शब्दकोश
हिरावून घे
काढून घे माझी व्याकरणं
जशी वस्त्रप्रावरणं

मला अस्खलित मुकेपणा दे
कल्पांतापर्यंत भळभळणारा
आणि मला ठार बहिरेपणा दे
वैकुंठाला झोंबणारा.
हे बहिऱ्या-मुक्यांच्या परमेश्वरा
तूही बहिराच
तूही मुकाच
तुझे भक्त मुके
तुझे भजन मुके
मुकेच त्यांचे वादन
मुकेच त्यांचे नर्तन
मुकीच त्यांची दिंडी
रुतलेली ब्रह्मांडी
किती कोणी ओरडले
कानीकपाळी पाखंडी
तरी बहिऱ्या मुक्यांच्या झुंडी
लागतील निस्तब्ध वैकुंठी

बहिऱ्या-मुक्यांची भक्ती
निरपेक्ष आणि निश्चल
वाचाळांचा स्वर्ग
निव्वळ शब्दांचा
हे ज्ञानोबा, हे तुकोबा
आज मला क्षमा करा
हे मराठी परंपरे
आज मला क्षमा कर
माझ्या ओठांवर आज आहे
सुन्नतेच्या सर्गाच्या पहिल्या श्लोकाची
सुरुवातीची ओळ.
□

## ६७. इमर्जन्सी

तळहातात पालटतात सूर्य आणि रात्री
हे माझ्या कमनशिब कच्च्याबच्चांनो
तुमच्या आईबापात ताकद नव्हती
चांगलं होण्याची. काटेरी कुंपणांत
उगवणारे आणि सुकणारे तुमचे जन्म
आणि तुमच्या तारुण्याच्या अंधारकोठडीबाहेर
सतत गस्त घालणारा
परमेश्वराच्या चाकरीतला पोलीस
हा आता आहे कपाळींचा कायदा.
लेखणीच्या फटकाऱ्यानिशी
गारद होऊ शकतं सर्वांचं भविष्य
आणि बंदुकी देतात आशीर्वाद
कोणीही न मागितलेला. आज
माझ्या बांधलेल्या मुसक्या,
हा तोंडीचा तोबरा,
माझ्या कच्च्याबच्चांनो
तुमचा पहिला धडा होवो
हे गळेबंद
महाकाव्य.
आता अ-आ-इ-ई
न-ना-नाही. गावठी कुत्र्यागत
अंधारात केकाटतील तुमचे महाकवी.
आणि त्यांना गोळ्या घातल्यावर
नांदेल तुमच्या निष्पाप चरित्रांवर
ही अलौकिक सामसूम
ही सामुदायिक निजानीज.
□

## ६८. साक्षात्कार

भुईखाली गाडून ठेवलेले स्वल्पविराम, उद्‌गार,
भूमिगत भुईमूग, स्तब्धतेत उबणारे
प्रथम उगवतात स्वप्नांत काळ्याबेऱ्या कोंदणांत

आणि वर, मोकळ्या बाजारात, जिथे तेल विकतात
खुल्या दराने, बुलंद आवाजांत दलाली करणारे
फायदेशीर भावाच्या ईश्वरदत्त प्रकाशात

तिथे इतिहासाच्या लाजेने घर सोडून पळणारे
हाताच्या बोटांवर मोजण्याजोगे उपसतात तलवार
सर्वस्वी घायाळ होऊन, परक्या अंगणात

माझ्या मुक्या पक्ष्यांनो, यापेक्षा बोलके पोपट व्हा
हिरवेगार आणि गा शिकवलेली गाणी
विसरून सह्याद्रीच्या अंगाखांद्यावरल्या जागा

आणि बापजाद्यांची निढळाची कमाई.
म्हणा हा मुलुखच नापीक, बरे नाजुकपणे कुजणे
पंखांतल्या पंखांत, जेव्हा फळफळते पेशवाई.

चिरेबंदी भिंतीआड अदृश्यपणे तडफडतात ते नामर्द
आणि खुल्या बाजारांत नाक खाजवतो तोच पुरुषार्थ.
□

## ६९. १९७५

विड्यासिगरेटींच्या धुरात लोपलं स्वराज्य
दाढेत अडकली सुपारी सोसाव्याची सामसूम होताना
तेव्हा खाली मानेने केली निरवानिरव
उडालो देशाबाहेर निरोप घेतल्याविना
फक्त आळंदीला कपाळ टेकलं निघण्यापूर्वी
एरव्ही खोलीत बंद झाले होते तंबोरे
परेल रोड क्रॉस लेनच्या गल्लीतून बाहेर पडलो
जयहिंद सिनेमासमोरची गर्दी टाळून गेलो
भायखळा गूडस डेपोची दगडी भिंत
जी रोज दोनदा तरी पाह्यली होती पाच वर्ष
ती ठेवली मागे
        उडालो देशाबाहेर
विड्या सिगारेटींच्या धुरातून
टाईपरायटरांच्या पानपतातून
घेणेकऱ्यांच्या तगाद्यातून
एक उपखंडव्रजा वैताग ज्यात पिकल्या
पिढ्यान्‌पिढ्या टाळचिपळ्या
झाला अंधूक गिचमीड नकाशा.
□

## ७०. स्मरणपत्र

“ पायातल्या पायात उपड्या झालेल्या चपलेला
माझा नमस्कार असो.”

१

ही ज्ञानरंध्रात झिरपणारी रात्र
हा अंध आणि भोर स्पर्श
आणि ही भोळी लहर भाळावर
लिहिलेली ओसरो नशीब

होवो मोकळा पुन्हा जन्मभरचा गळा
ह्या सफाईच्या फासांतून निसटो अवघड अंग
नद्यांमध्ये उतरून प्रतिबिंबं न्हालेल्या राया
उडोत राघू होऊन काळखंडणाऱ्या प्रकाशात
भाषेच्या उगाळलेल्या गंधात बुडालेली बोटं
होवोत अलग सहाणेवेगळं चंदन समजून

होवो दारांचा उघडेपणा अवकाशाला साजरा

२

निळाईच्या पांडुरंग अखेरपणापर्यंत
सर्वस्व विखरून माझ्या आर्तपणात
उमटो प्रदीर्घ गाभा भळभळणारं ब्रह्म मिटून
त्या स्मिताच्या विलगणाऱ्या ओठातून
माझा देठच गळो सबंध फुलापासून
हे माझ्या प्राणांच्या फोफावत्या वाऱ्यांनो
कुठे जाल आता ही शांतता व्यापून ?

३

रुजणाऱ्या ऋणांनी पोसतो मी
परतफेडीच्या फांद्या जातात अंगाखांद्याबाहेर
हे सहस्रावधी जन्म मी ज्या क्षणांत घेतले
त्याच्या कोंदणांच्या कणसांत फुटतात तुझे दाणे
ह्या खडकाळ ढगात मी भिजलो झुंजमुंज
काळोखून सर्व आशा पाऊसलो निराश
आता फाड ही भाषा जिभेवरल्या जिभेवर
उसवून तुझा एकाग्र उत्तुंग काटा
त्रिकाळात घुसलेला तुझा अविरत डंख

४

नकोत नकोत आता ह्या विघ्नांच्या वर्दळी
माझ्या गर्दपणाभोवती ठेव तुझं अविचल वलय
आणि शंखचक्र देवळांची फुटोत टेंगळं
माझ्या अंगभर सांभाळत तुझं मग्न साम्राज्य

होवोत हे बाहू समजूतदार तुझ्या मिठीत
भिडो सबंध खडक शिल्पाच्या जिव्हाग्रीं
संपोत माझी ग्रहणं माझी अतिभ्रमणं
पूर्णपणे उजाड होवो उजेडलेलं कपाळ

नाकीकानी गोविंद तोंडीडोळी कानीकपाळी गोपाळ
मुखीं मुकेपणाचा उभा विटेवर विठ्ठल
आणि सर्वांमुखीं स्तब्धतेचा धवधवो ओघ
पूस ह्या रेघा ह्या विक्राळ रांगोळ्या

ही सांजसकाळ पानांनी जळणारी तुळस
माझ्या राखेत कोसळणाऱ्या मंजिऱ्यांची भाषा

५

एका भग्न सकाळी भोवंड फाकताना
भडाग्नि दिला मी माझ्या भविष्याला
जागच्या जागीं फुटल्या लाह्यांच्या सह्या
प्रत्येक बीजातून फोडत समग्र अरण्य

आता शाश्वती कसलीच नाही
माझा मला मी नाही आवरत एकही प्रसंग
प्रसंग मोठ्यात मोठा संग
फुटताना झऱ्याभोवती शुभ्र डोंगर

६

झोंबतो डोळ्याला नक्षत्रांचा झोत
जसं आंधळेपणातून लोंबतं त्रिकाळ झुंबर
मायबापा हा कुठे ठेवू प्रकाश
एवढ्याश्या कातडीबाहेर किती काळ राहू ?

गळोत अश्रूएवढी जगं पडो ह्यावरही पापणी
मायबापा फार शेतं उगवली
कधी करशील माझी कापणी ?

७

जागोजाग कापला जाताना गळा
जर येणारच होता अविच्छिन्न ब्रह्माशीं संबंध
का वाहू दिलास भळाभळा आवडीचा रंग
निःस्संग समागमाच्या गोळा होणाऱ्या अवयवांत ?
जाणार होतो जर चिरला चिरंतन
जगड्व्याळ थाळीवर आजन्म ठिबकत
तर का ठेवलं नाहीस मला जागच्या जागीच
दगडाहून देखणा बनवून ?

८

जर माझा धर्मच तू आहेस तर हे व्यवहार
ज्यांचा कधीच नव्हतो बांधील का डसतात आता
का डोळ्यांच्या माळा तुटून गळतात मणी
का लागते अजून तहान दिसताच पाणी

जर माझा धर्मच तू आहेस तर भगवे कर आता
हे काळोखे संभोग हे नांगरलेले बिछाने
जर माझा श्वासच निळा आहे तर आवर आता
माझा प्रवास आणि ठिकाणांचे वळसे

९

पायरी जी कपाळात रुतवून
मी सोडली घरं स्वत:वर रुसून
मोजले आपल्याच अंगचे वासे एका वणव्यात
चाचपडत कोसळण्याचे जळते खांब

माझाही मागणीचा क्षण आता आलाय
ह्या सुटकेला कधीच नव्हती नि:श्वासाची मोकळीक
फेड फेड फेड माझे पांग
सर्वांग कुदवून

वस्त्रगाळ नग्नतेत माहेरी येतात सुखं
देहाचा स्वर्ग कुजताना येतो उग्र गंध
क्रोधात हास्य करतो मावळता नारायण
पाण्यातल्या पाण्यात ओलावा तुडवून

मी भिन्न भिन्न होऊन भिनलोय माझ्यात
छिन्न छिन्न वाजतायत नाचाआड पैंजण

१०

पत्त्याशिवाय पोहोचलेला मी माणूस
तुझ्या निरभ्रपणाच्या अरण्यात बेपत्ता
बेपत्ता माणसं बेपत्ता शहरं बेपत्ता देश
बेपत्ता अनुभवातले अनुभव आणि भवानुभव
उलगडता उलगडता जो अचानक लुगडलोय तुला
खोचतोय तुझा धोतरकाठी पाहुणेपणा
स्वतःच्या कमरेशी तुझी गाठ मारून
लावतोय कनवटीला तुझा भरगच्च पैसा.

११

बायांनो विवस्त्र व्हा ह्या घाटावर
ओता पाण्यात अंग सालस रंध्रांनी
बुडवून टाका घागरींची पोकळ इंद्रियं
पृष्ठभागापासून मोकळे करा जन्मांचे तळ

बायांनो नागड्या व्हा ह्या अविरळ डोहात
एकही लाट स्वतःची नसणारं पाणी होऊन
बायांनो झोंबल्या जाल एकदाच
झवतो वेगळाच एकांत गोविंद

१२

अनेक वर्षांची मिटलेली मूठ उघडून
नाचतात निजिन्स्की झालेले विस्मरणाचे मोर
मी किती निळा मी किती जांभळा केवढी तुझी भलाई
शुभ्रपणाला फोडते रंगांचा पिसारा

उन्हात न्हालेली दुःखं आमच्या जस्ताकथलाच्या पिढ्या
आज जेवोत सोन्याचांदीच्या ताटात तोंडाची चव जाऊन

झडोत पंगतींवर पंगती फाको जिभेचा पंख
भुंकेच्या आकाशात भरवला जावो पक्ष्यांचा घास

१३

बिनदाराचं माझं नशीब उघडलंयस तू
आता पाठव तुझे दूत माझा पत्ता शोधत
चमकून बघ माझ्या चेहऱ्यातलं प्रतिबिंब
धाव सैरावैरा माझ्याबाहेर पडून
ज्या परंपरेचा वणवा घुसलाय माझ्या अंगात
तिला वावगी नाहीत कोणतीच विस्तारती अरण्यं
सबंध ग्रहगोल खेळतोय माझ्या गळ्यातल्या आलापात
षड्जाखाली हात आहेत चेंडू गेलाय वर
पुरेत आता ही पाठमोरी संभाषणं
आणि ही सतत सामोरी चुकामूक
आपल्यातल्या आपल्यात आता धाव सैरावैरा
बाहेरल्या बाहेर सांभाळ सर्वांग

१४

तूच सांभाळ माझा अवाढव्य होणारा संसार
चुकव माथी घेतलेली जगभरची कर्जं
आकाराबाहेर अवघड झालेत पूर्वापारचे डोंगर
अंगीखांदी अवघडतोय समृद्धीचा बहर

तूच सांभाळ तुझा अनंतकाळचा फेटा
तूच सांभाळ ही तळहाती टेकवलेली सुपारी
तूच सांभाळ तुझी आजन्म पुरणारी देणी
हे माहेरच्या मारेकऱ्या तूच सांभाळ हे
विवाहांचे शाप हे सासरचे साप

जळो ही जीभ जळो ही खुणेची जखम

फार ओळख झाली आता परत ने घरी
जर असशील माझा हरी तर दाखव उघडून
ह्या तुरुंगात तुझा मुक्त देव्हारा

१५

ओसरलेला माणूस ह्या ओसरीवर येतो
चरित्राच्या चपला काढून तळपाय निववतो
स्वतःची काडी पेटवून खुद्द परमेश्वर
न बोलता त्याची विडी शिलगावतो

एकमेकांच्या सान्निध्यात दोघेही ऐकतात
खाटेखाली गाणारा रातकिडा
गावभर पसरलेली शांतता
कानांचा एकाग्र कोनाडा
ह्या संजीवन समाधीच्या
कातडीवर असेना का केसाळ वाढणारं जग
तुझ्या खेड्यात पोचलेला मी काळाभोर
कुडाच्या कुडीबाहेर बसलोय शांत

थांबवू नको हा ओघळणारा थेंब
घशाला पडतेय कोरड उघडल्या डोळ्यांच्या
संपवू नकोस हा आर्त समजुतीच्या निवांत
आपल्या परतभेटीत पांगणारं दुःख

१६

फुटलेल्या लगोरीची खापरं
नव्हती कधीच पुन्हा रचली जाणार एकत्र
चेंडूच हरवणार होता पांगणार होते भिडू
कोणीच जिंकणार नव्हतं तो न संपलेला खेळ

मी वड होईन तुम्ही सूरपारंब्या खेळा
जो म्हणाला सुखदुःखांना त्याची साल
लागणार होती सातासमुद्रांपलिकडे पिंपळांना
अरण्यात बदलणार होते झाडांचे अर्थ

बुलंद आवाजांचे तेजःपुंज ऋषी
मध्यमात मावळणारा त्यांचा मालकंस
शाळुंकेवर उगवणार होती बेभान पिंडी
कागदावर फुटताना पोटफोडी शाई

हे सामर्थ्य सांभाळण्याला मला शक्ती दे
खेळ आटोपून अनुभव दे मला अंगण

१७

अंधत्वाला प्रकाशाचा आधार
तेव्हा धबधबाच थांबतो
जेव्हा ओथंबतो पाण्याचा आकार
कोरडेपणाच्या न कोसळणाऱ्या वेळेत
गळ्यातल्या गळ्यात फिरते तानेची सुरी
थंड तंबोऱ्यावर स्थिरावते नक्षी
दिगंती उडणारा पक्षी मूळचाच निश्चल
ओठांवर तू सदैव उभाच
जणू काय मीच तुझी अपरूप वीट
जणू काय कंठ छेदताच बाहेर पडेल वैकुंठ
दिपतील सूरदास ठार बहिरे होतील तुकाराम
त्या एकटक पाहण्याच्या पोकळीत
फूलपणाला नाही गंधाचा आधार
गळणाऱ्या पाकळीबाहेर नसतो नावालाही अंधार

१८

असत्याचा नसता झालो तेव्हाच
घळाघळा रडलो एका आनंदात
वेशीबाहेरून पाहिला जन्माचा गाव
झालो मोकळा उदासांचा दास

हात पसरून उभा राहिलो दिले सर्वांना आशीर्वाद
अथांग तेलात बुडून गेली माझी वात
पिऊन पिऊन जळलो राजी झालेली ज्योत
हजार सूर्यांचा अर्थ आला माझ्या मिणमिणण्यात

आता कशातून मी वेगळं काढू हे अंग
ज्याला गाभाही उरलेला नाही
वधूवरांचा वध झालाय भर मांडवात
तरी सप्तपदी अजून संपलेली नाही

१९

चालू दे मला ह्या रस्त्यात श्रीरंगपणे
ह्या प्रभामय शांततेच्या वलयात डोलत
घेऊ दे जवळ मला सर्वांना
तुझं रूप विखुरत

REFBK-0022591
REFBK-0022591

चढू दे मला उतरत्या पायऱ्या थेटपर्यंत
जमू दे माझ्याभोवती हकनाक गर्दी
मला भोवळ येतेय सतत आठवणींची
समोर घाटावरून चालत येतायत सतत एकनाथ

माझ्या चेहऱ्यात नाचतायत तुझ्या विजयी पताका
कुटला जातोय मी टाळ मी टाळ्याला लागलेली जीभ
मला जाऊ दे अखेरपर्यंत असाच ओसंडत
रस्तोरस्ती लाट लागेलटेतू पंढरपूर
□

22591
23eu